130

कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नासिक या संस्थेच्या कार्यपद्धतीचा सखोल मुल्यमापन अभ्यास अहवाल


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,
पुणे - ४११ ००१.

१९९५

# प्रस्तावना

आदिवासी बांधव शेतीसाठी अजूनही पारंपारिक पध्दतीचाच अवलंब करतात. शेतजमिनीची मशागत, पाण्याचे नियोजन, यासाठी आता आधुनिक तंत्रे वापरात आहेत. आदिवासींचे जमिनीतही आधुनिक पध्दतीने शेती करणे आवश्यक ठरते. पण त्यासाठी त्यांना पुरेसे मार्गदर्शन, योग्य प्रशिक्षण व साधने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आणि ते साकारण्यासाठी त्यांची मानसिकता विकसित करणे ही काळाची गरज आहे. ५ किलोमीटर परिघ क्षेत्रात महामंडळाच्या प्राथमिक सदस्य आदिवासी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील विकास साधणे शक्यआहे.

महामंडळ ही एक सेवाभावी संस्था आहे. महामंडळाचा मुख्य उद्देश राज्यातील आदिवासींची आर्थिक पिळवणूक थांबविणे व आदिवासींचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हा आहे.

आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासींचे शेतजमिनीची उत्पादनक्षमता विद्युत पंपाच्या सहाय्याने वाढविण्यात येते. स्वयंरोजगार व तत्सम योजनांना चालना देऊन आदिवासींचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न मोठया प्रमाणावर करण्यात आला आहे. आदिवासी बांधवांना दैनंदिन गरजेच्या वस्तू प्राथमिक केंद्रामार्फत किफायतशीर दराने पुरविण्याचे काम महामंडळ करते. यामुळे भाव, वजन, मातील गैर प्रकारामुळे होणारी आदिवासी बांधवांची फसवणूक बऱ्याच प्रमाणात थांबविणे शक्य झाले. आदिवासींच्या मालाचे योग्य मोजमाप व्हावे व त्यांच्या उत्पादित मालाची योग्य व पुरेपूर किंमत त्यांना मिळावी यासाठी त्यांच्या मालाची एकाधिकार पध्दतीने खरेदी करण्यात येते. एकाधिकार धान्य खरेदी योजनेसोबतच आदिवासी उपयोजना क्षेत्रात अन्न व नागरी पुरवठा खात्यासाठी राबविण्यात येणारी आधारभूत किंमत खरेदी योजना देखील महामंडळाने यशस्वीरित्या राबविली आहे.

या सर्व योजनांचा लाभ आदिवासीही मोठ्या प्रमाणावर घेत आहेत.

प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालात महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आदिवासींनी घेतलेल्या लाभाचे परिणाम दर्शविण्यात आले आहेत. महामंडळाच्या योजना राबविण्याच्या यंत्रणेतील त्रुटींमुळे योजनांची फलनिष्पत्ती काय होते याचाही परिणाम प्रस्तुतच्या मूल्यमापन अहवालामध्ये घेण्यात आला आहे. योजनांची अंमलबजावणी व त्यासाठी लागणारे कार्यक्षम अधिकाऱ्यांची उपलब्धता, इतर विभागांशी समन्वय या गोष्टीही अत्यंत महत्वाच्या ठरतात.

आदिवासींना जोडधंदे देण्याची व योजनांचा लाभ घेताना प्रशिक्षणाचीही गरज आहे. त्यामुळे त्यांची सामाजिक उन्नती होऊ शकेल. त्याबरोबरच आदिवासींमधील साक्षरतेचेही प्रमाण वाढविणे हे ही तितकेच महत्वाचे आहे.

सदर मूल्यमापन अहवाल तयार करण्याचे काम संस्थेतील सौ.मंगल घोडे, संशोधन अधिकारी यांनी श्री.एस.पी.बनसोडे, उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. श्रीमती जयश्री गुंड व श्रीमती उज्वला थोरात यांनी त्यांना सहाय्य केले. तसेच सदर अहवालाचे डी.टी.पी.यंत्रणेवर टंकलिखित करण्याचे काम श्री.के.पी.कुर्डे, लघुटंकलेखक यांनी पूर्ण केले.

या योजनांची माहिती पुरविण्यासाठी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक तसेच महामंडळाची प्रादेशिक कार्यालये, प्रकल्प अधिकारी, आश्रमशाळांचे मुख्याध्यापक यांचे सहकार्य मिळाले.

सदर मूल्यमापन पाहणी अहवाल, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक व त्यांची प्रादेशिक कार्यालये, प्रकल्प अधिकारी इ. कार्यालयातील अंमलबजावणी अधिकारी व कर्मचारी, सेवा सहकारी संस्थांचे सेक्रेटरी, यांना व इतर संबंधितांना योजना राबविताना व नियोजन करताना उपयोगी पडेल, अशी आशा आहे

पुणे

दिनांक- १२.९.९१

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण विषय | | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| | प्रास्ताविक | | ४ |
| १. | प्रकरण क्र.१ | योजनेचा आढावा | ५ |
| २. | प्रकरण क्र.२ | संशोधन पध्दती | ११ |
| ३. | प्रकरण क्र.३ | निवडक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास | १३ |
| ४. | प्रकरण क्र.४ | सर्वेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथ:करण | २० |
| ५. | प्रकरण क्र.५ | निरीक्षणात्मक बाबी | ३४ |
| ६. | प्रकरण क्र.६ | सूचना तथा शिफारशी | ४१ |
| | *प्रपत्र क्र.१* | *कार्यान्वय अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली* | |
| | *प्रपत्र क्र.२* | *लाभार्थ्यांसाठी प्रश्नावली* | |
| | *प्रपत्र क्र.३* | *प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली* | |
| | *प्रपत्र क्र.४* | *शासकीय आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली* | |

# प्रास्ताविक

१९९१ सालच्या जनगणना अहवालानुसार महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य करणाऱ्या आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी ९.२७ % इतकी आहे. त्यापैकी ८० % लोकसंख्येचा समावेश दारिद्रय रेषेखाली आहे. सह्याद्री, सातपुडा व गोंडवन भागातील अतिशय दुर्गम भागात डोंगरदऱ्यात राहणारा आदिवासी समाज स्वातंत्र्यप्राप्तीची चार दशके पूर्ण झाली असली तरी आजही आर्थिकदृष्टया मागासलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य शासनाने आदिवासी समाजाच्या विकासासाठी अनेकविध योजना आखल्या असल्या तरी मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली असलेली आढळते.

देशाच्या आर्थिक विकासामध्ये समतोल प्रस्थापित करण्यासाठी आदिवासी, गिरीजन व आदिम जमातींना देशाच्या प्रमुख प्रवाहात सामील करुन घेणे हे केंद्र व राज्य शासनाचे मुख्य उदिष्टय आहे. या दृष्टीकोनातून राज्यातील आदिवासींची विविध मार्गाने होत असलेली आर्थिक पिळवणूक थांबविण्याचे एक प्रभावी साधन म्हणून सन १९७२ साली महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० अन्वये 'महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची' स्थापना करण्यात आली.

प्रथमत: महामंडळातर्फे अति दुर्गम व डोंगराळ भागात प्राथमिक केंद्र उघडण्यात आली. या केंद्राद्वारे आदिवासी जनतेस दैनंदिन गरजेच्या जीवनाश्यक वस्तु (रास्त दरात) उपलब्ध करुन देणे हे महत्वपूर्ण काम हाती घेण्यात आले. राज्य विधी मंडळाने सन १९७६ साली महाराष्ट्र जनजाती आर्थिक स्थिती सुधारणा हा क्रांतीकारी कायदा संमत केला. त्यातील तरतूदींच्या आधारे राज्य शासनाने महामंडळाची प्रमुख अभिकर्ता (Chief Agent) म्हणून नेमणूक केली. या कायद्यातील तरतूदींमुळे आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासी शेतकऱ्यांकडून उत्पादित कृषी अन्नधान्य व गौणवनौपजे यांच्या खरेदीसाठी एकाधिकार पध्दत तसेच आदिवासींची जुलमी सावकारीशाहीपासून पिळवणूक थांबविण्यासाठी व कुपोषणापासून आदिवासींचे संरक्षण करण्यासाठी खावटी कर्जवाटप या योजनांची अंमलबजावणी सुरु झाली.

प्रथमत: प्रायोगिक तत्वावर केवळ सात तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या या योजना आता एकूण आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १४ जिल्हे व ६२ तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

## प्रकरण क्र.१

## योजनेचा आढावा

महाराष्ट्र राज्य शासनाच्या आर्थिक पाठबळावर पूर्णतः निर्भर असलेले 'आदिवासी विकास महामंडळाची' प्रमुख उद्दिष्टये खालीलप्रमाणे होत-

१. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शेती व वनौपजक खरेदी विक्री करणे.

२. संलग्न संस्थांचा आर्थिक विकास घडवून त्यांच्या हितसंबंधांचे संवर्धन करणे व शिखर संस्था म्हणून मार्गदर्शन करणे.

३. शासन संलग्न संस्था किंवा इतर संबंधित विचारांच्या संस्था व महामंडळे यांच्या सहकार्याने व वतीने आदिवासी विकासाची संबंधित कामे करणे.

४. संलग्न सभासद संस्थाकरिता मध्यवर्ती खरेदीदार व विक्रेता म्हणून काम करणे.

५. राज्यातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी पावले उचलणे.

६. आदिवासींना रोजगार मिळेल, असे कार्यक्रम हाती घेणे व त्यास उत्तेजन देणे.

७. आदिवासींच्या कल्याण व सुधारणेसाठी तसेच उपनिर्दिष्टांच्या पूर्तीसाठी व ते साध्य करण्यासाठी सर्व कायदेशीर बाबी, कामे व इतर तदनुषंगिक गोष्टी हाती घेणे व त्यांची अंमलबजावणी करणे.

८. आश्रमशाळांना चोख अशी साधनसामुग्री , अन्नधान्य व मालपुरवठा करणे व आदिवासींसाठी जीवनावश्यक वस्तु उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र चालविणे.

९. चांगली बाजारव्यवस्था निर्माण करणाऱ्या प्रक्रियेचे संदर्भात कारखाने उभारणे.

१०. आदिवासींच्या विकासासाठी शासनाने सोपविलेल्या योजना राबविणे.

या प्रमुख उद्दिष्ट पूर्तीसाठी आदिवासी विकास महामंडळ कार्यरत आहे.. .

१.२ महाराष्ट्र राज्यातील आदिवासी बांधवांकरिता आदिवासी विकास महामंडळामार्फत पुढील अनेकविध कल्याणकारी व उपयुक्त उपक्रम राबविले जातात.

### १. *एकाधिकार व आधारभूत किंमत खरेदी योजना :-*

**'महाराष्ट्र जनजाती आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा-१९७६'** अन्वये निर्देशित शेती व जंगल उत्पादित मालाची खाजगी व्यापाऱ्यांना खरेदी विक्री तसेच सावकारीचा व्यवसाय करणेस मनाई करण्यात आली. हे अन्नधान्य व किरकोळ उत्पादन यांची एकाधिकार खरेदी १९७७-७८ पासून आदिवासी विकास महामंडळामार्फत करण्यात येते.

सन १९७७-७८ मध्ये महाराष्ट्रातील ७ तालुक्यात प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आलेली ही योजना तिचे महत्व, तिला मिळालेला प्रतिसाद व आदिवासी भागात जनतेची मागणी लक्षात घेऊन तिची व्याप्ती वाढवून आजमितीस ती ६२ तालुक्यापर्यंत विस्तृत करण्यात आली आहे.

प्रतवारीवर आधारीत रास्त भाव तसेच जिल्हाधिकारी यांचेकडून नजिकच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तत्कालीक बाजारभावावरुन निर्धारित होणारे दर हे या योजनेचे वैशिष्ठय आहे.

## २. वीजपंप/तेलपंप पुरवठा योजना

आदिवासी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान देऊन विकास साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शासनामार्फत १०० टक्के अनुदान तथा शेतकरी सहभाग योजनेखाली वीजपंप/तेलपंप संच खरेदी करुन ते आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतात नियोजित ठिकाणी बसवून सुरु करुन देण्याचे काम महामंडळ सन १९८०-८१ पासून करीत आहे. या योजनेखाली आदिवासी लाभार्थींची निवड मा.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचेकडून कार्यबल 'टास्कफोर्स' समितीच्या शिफारशीनुसार केली जाते. लाभार्थींच्या शेतातील उपलब्ध असलेल्या पाण्याच्या ठिकाणी वीजपंप/तेलपंप संच बसवून प्रतयक्ष पाणी काढून देण्यापर्यंतची सेवा महामंडळा १९८०-८१ पासून आदिवासी बांधवांना देत आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी स्तरावरील सहाय्याने ही योजना राबविण्यात येते, हे या योजनेचे वैशिष्ठ्य होय.

## ३. खावटी कर्ज योजना

आदिवासी भागात सावकार व व्यापाऱ्यांकडून होणारी आदिवासी बांधवांची पिळवणूक थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आर्थिक स्थिती सुधारणा कायदा १९७६ अन्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रात खाजगी सावकारी करण्यास प्रतिबंध केला. मात्र असे करतांना आदिवासी शेतकरी, शेतमजूर यांची ऐन पावसाळयात अडचण होऊ नये यासाठी खावटी कर्ज वाटपाची योजना सुरु केली.

या योजनेमुळे पावसाळयामध्ये आदिवासींचे कुपोषणापासून संरक्षण झाले.

या योजनेअंतर्गत १९७८ पासून अल्पभूधारकास रु.२५०/- पर्यंत व भूमीहीन शेतमजूरास रु.१००/- पर्यंत कर्ज वाटप करण्यात येत होते. ही मर्यादा फारच कमी पडत असल्याने सन १९९२ च्या पावसाळयापासून सर्वांना सरसकट प्रत्येकी रु.४००/- कर्ज वाटपाचा अत्यंत महत्वाचा निर्णय शासनाने घेऊन आदिवासींना दिलासा दिला आहे. कर्जवाटपाचे प्रमाण ९० टक्के भाग धान्यरुपाने व १० टक्के भाग रोख रुपात देण्यात यावे.

## ४. न्युक्लिअस बजेट योजना

आदिवासी क्षेत्रात सार्वजानिक वितरण व्यवस्था अधिक मजबूत आणि व्यापक करण्याच्या दृष्टीने शासनाने एक विशेषकृती कार्यक्रम तयार करुन बहुतांश आदिवासी लोकांची आर्थिक परिस्थिती फारच कमकुवत असल्यामुळे त्यांना स्वस्त धान्य दुकाने चालविणे शक्य व्हावे या उद्देशाने सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात नवीन आदिवासी रास्तभाव दुकानदारांना आदिवासी विभागातर्फे खेळते भांडवल म्हणून आर्थिक सहाय्य देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. शासनाच्या विशेष कृती कार्यक्रमाखाली न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकान सुरु करण्यासाठी आदिवासी लाभार्थीस रु.१०,०००/- मर्यादेपर्यंत ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिनव्याजी कर्ज देण्यात येते.

या योजनेतील कर्ज भागाचे वाटप आदिवासी विकास महामंडळाकडून करण्यात येते तर ५० टक्के प्रमाणातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात येते.

## ५. शासकीय आश्रमशाळा पाणीपुरवठा योजना-

आदिवासी उपयोजना व त्याबाहेरील क्षेत्रात आदिवासी विद्यार्थ्यांकरिता शासनाने आश्रमशाळा उघडल्या आहेत. या शाळा साधारणतः दुर्गम व डोंगरी भागात असून या भागामध्ये पाण्याच्या सोयी पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नाहीत ही वस्तुस्थिती विचारात घेऊन शासनाने महामंडळाकडे पेयजल पुरवठा योजना सोपविली आहे.

## ६. शासकीय आश्रमशाळांना आवश्यक वस्तुंचा पुरवठा

राज्यातील सर्व आश्रमशाळांना (शासकीय) अन्नधान्य, किराणा माल व वह्या या वस्तुंचा पुरवठा केला जातो. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना १०० व २०० पेजेस वह्यांचा पुरवठा करण्यात येतो.

## ७. प्राथमिक केंद्र चालविणे

महाराष्ट्राच्या आदिवासी उपयोजनेअंतर्गत दुर्गम व अति दुर्गम तथा डोंगराळ भागातील आदिवासी बांधवांना जीवनाश्यक वस्तुंचा पुरवठा वाजवी किंमतीत व्हावा म्हणून प्राथमिक केंद्राची योजना महामंडळामार्फत सातत्याने राबविली जात आहे.

## ८. खावटी कर्ज योजना

आदिवासी भागात सावकार व व्यापाऱ्यांकडून होणारी आदिवासी बांधवांची पिळवणूक थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा-१९७६ अन्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रात खाजगी सावकारी करण्यास प्रतिबंध केला. मात्र असे करतांना आदिवासी शेतकरी, शेतमजूर यांची ऐन पावसाळयात अडचण होऊ नये यासाठी खावटी कर्ज वाटपाची योजना सुरु केली. महामंडळ सन १९८७-८८ पर्यंत ही योजना आदिवासी सेवा सहकारी संस्थांचे सहकार्याने राबवित होते. सन १९८८-८९ पासून सदरहू योजना आदिवासी विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने राबविली जात आहे.

सन १९९२ पासूनच्या पावसाळयापासून सर्वांना सरसकट प्रत्येकी रु.४००/- कर्ज वाटपाचा अत्यंत महत्वाचा निर्णय शासनाने घेऊन आदिवासींना दिलासा दिला आहे. कर्ज वाटपाचे प्रमाण ९० टक्के भाग धान्य रुपाने व १० टक्के भाग रोख रुपाने देण्यात येतो.

## ९. द्वार वितरण व्यवस्था-

अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानदारांना पूर्वी तालुका पातळीवरील गोदामातून शिधा वस्तुंची उचल करावी लागत होती. त्यामुळे बऱ्याचवेळा वाहनाच्या अभावी दुर्गम भागात वेळीच शिधा वस्तुंची वाहतूक होत नव्हती. त्यामुळे आदिवासी व दुर्गम भागात वेळेवर शिधा वस्तु मिळत नव्हत्या. ते होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाने द्वार वितरण योजना आदिवासी विकास महामंडळामार्फत सुरु केली. सदर योजनेमार्फत शिधा वस्तु ह्या थेट स्वस्त धान्य दुकानापर्यंत महामंडळाकडे सुपूर्त केलेल्या वाहनामार्फत वाहतूक केली जात आहे. त्यामुळे दुर्गम व आदिवासी भागात शिधा वस्तू वेळेवर व मुबलक मिळू लागल्या आहेत.

## १०. *विशेषवृत्ती कार्यक्रम :-*

सार्वजानिक वितरण व्यवस्था प्रभावीपणे राबविण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम शासनाने सुरु केला आहे. योजनेअंतर्गत वितरीत होणाऱ्या शिधा वस्तू नजिकच्या गोदामातून उचल करण्यासाठी शासनाने दुर्गम भागातील आदिवासी विकास महामंडळाकडे असलेल्या गोदामातील काही भाग आरक्षित केला आहे.

## ११. *एकलव्य मिनीट्रक योजना :-*

आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात व्यवस्थेची कमतरता भरुन काढण्याकरिता महामंडळाने १९९२-९३ या वर्षी नवीन जबाबदारी उचलली आहे. याची फलश्रुती म्हणून राष्ट्रीय वित्तीय विकास, नवी दिल्ली यांच्या सहाय्याने अनुसूचित जाती/जमाती करिता वित्तीय विकासाच्या विविध योजना राबविण्यास महामंडळाने सुरवात केली आहे.


या उपक्रमाखाली एकलव्य मिनीट्रक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये ग्रामीण भागातील अनुसूचित जमातींच्या होतकरु उद्योजक व सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे प्रकल्प उभारण्यास मदत करुन त्यांचा आर्थिक विकास वेगाने घडवून आणण्यासाठी हलक्या वजनाची व्यापारी वाहने सवलतीचे व्याज दरातील कर्ज सहाय्याने उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. ही योजना १ डिसेंबर, १९९३ पासून सुरु करण्यात आली आहे. लाभार्थ्यांचा स्वत:चा सहभाग म्हणून लाभार्थ्यांकडून फक्त १०% एवढी रक्कम घेतली जाणार आहे. उर्वरित रक्कम राष्ट्रीय अनुसूचित जाती/जमाती आयोग आणि महामंडळाकडे उपलब्ध असलेली रक्कम मिळून पूर्ण केली जाणार आहे. शासनाकडून या प्रकल्पात खरेदी केले जाणारे वाहनावर विक्री करात सवलत दिली जाणार आहे.

राज्यातील अत्यंत दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी जमातींना वरील सर्व उपक्रमांचा लाभ घेता यावा या उद्देशाने राज्यात महामंडळाची एकूण आठ प्रादेशिक कार्यालये व एकोणतीस उप प्रादेशिक कार्यालये कार्यरत आहेत.

याशिवाय महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या प्रत्येक प्रादेशिक कार्यालयाशी संलग्न असलेल्या जिल्हानिहाय आदिवासी संस्थांची आकडेवारी ११६ होते. यावरुन महामंडळाच्या कामाची व्याप्ती लक्षात येते.

याबाबत विस्तृत माहिती देणारा तक्ता पुढे जोडला आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय नाशिक येथे स्थित असून गोंडवन विभागाकरिता नागपूर येथे एक विभागीय कार्यालय आहे. या कार्यालयाची श्रेणीरचना आपल्याला खालीलप्रमाणे दर्शविता येईल.




उपरोक्त विश्लेषणावरुन आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे 'महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ' हे एक मोठे आर्थिक तसेच व्यावसायिक संघटन (Organization) असल्याचे स्पष्ट होते. आदिवासींचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी अनेकविध योजना राबविणारी, आदिवासींच्या आर्थिक हितसंबंधाशी निगडीत असणारी ही एक मान्यवर संस्था आहे. संपूर्णपणे स्वयंशासित (Autonomy) असलेलया या संस्थेवर राज्य शासनाचे नियंत्रण आहे. शासनाने आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी जी चांगली उदिष्ट्ये डोळयासमोर ठेवली आहेत, ती प्रत्यक्षात उतरविण्याचे काम 'मुख्य अभिकर्ता' या नात्याने आदिवासी विकास महामंडळावर सोपविले आहे. त्यादृष्टीने ही संस्था तिच्यावर सोपविलेले काम करते.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या प्रत्येक प्रादेशिक कार्यालयाशी संलग्न असलेल्या जिल्हानिहाय आदिवासी सहकारी संस्था

तक्ता क्र.१.१

(३०.९.९३ ची आकडेवारी)

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नांव | जिल्हा | आदिवासी सेवा संस्थांची आकडेवारी | त्यापैकी महामंडळाच्या नाशिक कार्यालयाशी संलग्न संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | जव्हार | १. ठाणे | ११९ | ११७ |
| | | २. रायगड | १५ | ९ |
| २. | नाशिक | ३. नाशिक | १६५ | १६५ |
| ३. | नंदूरबार | ४. धुळे | १८४ | १८४ |
| | | ५. जळगांव | ६ | ६ |
| ४. | जुन्नर | ६. पुणे | २६ | २६ |
| | | ७. अहमदनगर | ३७ | ३३ |

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नांव | जिल्हा | आदिवासी सेवा संस्थांची आकडेवारी | त्यापैकी महामंडळाच्या नाशिक कार्यालयाशी संलग्न संस्था |
|---|---|---|---|---|
| ५. | यवतमाळ | ८. यवतमाळ | ९२ | ९२ |
| | | ९. नांदेड | २४ | २४ |
| | | १०. अमरावती | ३३ | ३३ |
| ६. | भंडारा | ११. भंडारा | ३९ | ३९ |
| | | १२. वर्धा | २ | २ |
| | | १३. नागपूर | १३ | १३ |
| ७. | गडचिरोली | १४. गडचिरोली | १२० | ११७ |
| ८. | चंद्रपूर | १५. चंद्रपूर | ६३ | ५६ |
| | **एकूण** | **१५ जिल्हे** | **९३८** | **९१६** |

*संदर्भ :- महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, अहवाल-१९९२-९३*

# प्रकरण क्र.२

## संशोधन पध्दती

२.१ महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, मर्या.नाशिक या संस्थेचे मूल्यमापन करणारा हा अहवाल इतर अहवालांपेक्षा थोडा वेगळा, वैशिष्ठ्यपूर्ण आहे. याचे कारण योजनांचे मूल्यमापन करणे, विशिष्ट सामाजिक, आर्थिक समस्या निवडून त्या क्षेत्रात संशोधन करणे, विशिष्ट सैध्दांतिक बाबींवर संशोधन करणे, काही समूह गट जमातीचे मूल्यमापनात्मक सर्वेक्षण करणे यापेक्षा एखाद्या सामाजिक संस्थेचे मूल्यमापनात्मक सर्वेक्षण करणे हे निश्चितच उपनिर्दिष्ट संशोधनापेक्षा भिन्न ठरते. विशेषत: ही संस्था सामाजिक क्षेत्रातील पण आर्थिक योजनांची अंमलबजावणी करणारी महत्वाची आर्थिक संस्था असेल तर तिच्या विविध योजनांचे कार्यात्मक पैलुंचे मूल्यमापन करण्यासाठी परिपूर्ण संशोधन पध्दतीची गरज निर्माण होते. या दृष्टीकोनातून आदिवासी विकास महामंडळ, संस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी संशोधन पध्दतीची निवड अत्यंत विचारपूर्वक अभ्यासातून करण्यात आली.

२.२ हा मूल्यमापन अहवाल एका विशिष्ट संस्थेच्या कार्यात्मक बाबीचे मूल्यमापन करणारा असल्यामुळे साहजिकच संशोधनाचा अभ्यास विषय 'महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ' ही एकच संस्था आहे. एकच घटक (Unit) असल्यामुळे सखोल अध्ययनासाठी 'व्यष्टी घटक अध्ययन पध्दती' (Case study method) या संशोधन पध्दतीची निवड करण्यात आली. कारण या पध्दतीत एका वेळेस एकाच एककाचा अभ्यास केला जातो. हा एकक व्यक्ती, संस्था अथवा समुदाय असू शकतो. या पध्दतीमुळे निवडलेल्या एककाचे सुक्ष्म व खुलासेवार अध्यन करता येते. अध्ययन जास्तीत जास्त परिपूर्ण होण्याकरिता ही पध्दती उपयुक्त ठरु शकते. ही पध्दती प्रामुख्याने गतकालीन आणि वर्तमानकालीन तथ्थ्यांवर अवलंबून असते. या संशोधन पध्दतीत प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नावली, अनुसूचि, वैयक्तिक मुलाखती या तंत्रांवर भर देण्यात येतो. तसेच प्राथमिक श्रोताबरोबरच द्वितीय श्रोतातून म्हणजे विविध प्रकारची कागदपत्रे, संदर्भ पुस्तके, वृत्तपत्रीय कात्रणे, प्रशासकीय कागदपत्रे आदितून तथ्थे (Facts) गोळा करण्यावर भर दिला जातो.

२.३ या अहवालाकरिता व्यष्टी/घटक अध्यन पध्दती निवडलेली असल्यामुळे याविषयीची संबंधित सांख्यिकी माहिती व तथ्थे गोळा करण्यासाठी चार प्रकारच्या प्रश्नावली बनविण्यात आल्या. त्याची माहिती याप्रमाणे-

तक्ता क्र.२.१

| अ.क्र. | प्रपत्र कोणासाठी | विषय |
|---|---|---|
| १. | प्रादेशिक उपप्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ | महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, संदर्भित सांख्यिकी माहिती, प्रशासकीय समस्या समजून घेण्याकरिता |
| २. | लाभार्थीसाठी प्रश्नावली | आदिवासी लाभार्थ्यांना महामंडळाकडून मिळत असणारी प्रत्यक्ष मदत , महामंडळाबाबत लाभार्थ्यांचा दृष्टीकोन व या मदतीमुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्तरामध्ये पडणारा फरक अभ्यासण्याकरिता |

| अ.क्र. | प्रपत्र कोणासाठी | विषय |
|---|---|---|
| ३. | प्रकल्प अधिकाऱ्यांकरिता प्रश्नावली | महामंडळासमवेत ज्या योजना प्रकल्पांतर्गत राबविण्यात येतात, त संदर्भातील सांख्यिकी माहिती व महामंडळाविषयीचा दृष्टीकोन समजून घेण्याकरिता |
| ४. | शासकीय आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांकरिता प्रश्नावली | महामंडळ शासकीय आश्रमशाळांना करीत असलेल्या वस्तु व पाण पुरवठ्याबाबत माहिती घेण्याकरिता तसेच मुख्याध्यापकांचा महामंडळाबाबतचा दृष्टीकोन समजावून घेण्याकरिता |

उपरोक्त प्रपत्रे अहवालाच्या शेवटी सादर करण्यात आली आहेत.

२.४ उपरोक्त प्राथमिक श्रोतांशिवाय या मूल्यमापन अहवालाकरिता दुय्यम श्रोत (Secondary data) देखील वापरण्यात आले आहेत. आदिवासी विकास महामंडळाचे वार्षिक अहवाल, गवत एकाधिकार खरेदी गैरव्यवहार विषयक श्री.सुखराम उईके, समितीचा अहवाल, वृत्तपत्रीय कात्रणे, आदिवासी विकास महामंडळाची दैनंदिनी-१९९३-९४, प्रशासकीय कागदपत्रे, १९९० साली महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपकालीन मागण्यांचे निवेदन व 'Report of cost study of Maharashtra State Co-Operative Tribal Development Corporatiom Ltd. Prepared by Nashik other chapter of cost Accountants' इत्यादी विविध संदर्भीय कागदपत्रावरुन महामंडळाबाबत आवश्यक माहिती मिळविण्यात व्यष्टी अध्ययन पध्दतीत नमूद केल्याप्रमाणे या दुय्यम श्रोताद्वारे आदिवासी विकास महामंडळाच्या मूल्यमापनाकरिता आवश्यक अशी महत्वाची सांख्यिकी माहिती व तथ्ये उपलब्ध होऊ शकली.

२.५ प्रपत्रे, संदर्भीय कागदपत्रे या बरोबरच या अहवालाकरिता प्रत्यक्ष निरीक्षणासही महत्व देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाच्या नाशिक येथील मुख्यालयास भेटी देण्यात आल्या असून या व्यतिरिक्त जुन्नर, घोडेगांव, ठाणे, नागपूर, नाशिक या विभागातील प्रकल्प अधिकारी, प्रादेशिक /उपप्रादेशिक व्यवस्थापक आदि प्रशासकीय कार्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन संदर्भीत माहिती/प्रश्नावली भरुन आणण्यात आली. तसेच लाभार्थीची प्रपत्रे भरुन आणण्याकरिता जुन्नर, घोडेगांव, नाशिक, ठाणे या विभागांची निवड क्षेत्रीय पाहणीकरिता करण्यात आली.

## २.६ लाभार्थी निवड पध्दती :-

हा मूल्यमापन अहवाल आदिवासी विकास महामंडळ या संस्थेबाबत असल्यामुळे संशोधन अहवालासाठी नमुना निवड करतांना जिथे महामंडळाची कार्यालये आहेत, त्या आदिवासी भागाची निवड प्राधान्याने करणे क्रमप्राप्त झाले. तसेच लाभार्थीची निवड करतांना जुन्नर, घोडेगांव, नाशिक, नागपूर या विभागातील लाभ घेतलेले लाभार्थी निवडण्यात आले. लाभार्थीची निवड करतांना ते आदिवासी विकास महामंडळाच्या एक किंवा अधिक योजनांचा लाभ घेणारे असतील हा निकष लावण्यात आला. लाभार्थ्यांची यादी व माहिती प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालयातून उपलब्ध करुन घेण्यात आली. या यादीतील काही आदिवासींची निवड लाभार्थ्यांची प्रश्नावली भरुन घेण्याकरिता करण्यात आली.

प्रकरण क्र.३

## निवडक वैयक्तिक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास (Case Study)

आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांखालील लाभार्थ्यांच्या एकत्रित अभ्यासाशिवाय काही वैयक्तिक प्रकरणांचा 'योजना निहाय' अभ्यास करण्याचे ठरविल्यामुळे काही निवडक प्रकरणांच्या अभ्यासासाठी खालील प्रमुख उदिष्टये ठरविण्यात आली.

३.१.१ ज्या आदिवासी शेतकऱ्यांनी योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेतला त्यांच्यावर झालेल्या योजनांचा प्रभाव/परिणामांची स्थिती अजमावणे.

२. महामंडळाला लाभार्थ्यांने विकलेल्या गौण, वनौपज व अन्नधान्याबाबत लाभार्थीस झालेल्या आर्थिक फायद्याचा अभ्यास करणे.

३. खावटी कर्ज योजना, न्युक्लिअस बजेट योजना अशा योजनांचा परिणाम अभ्यासणे.

४. शासकीय आश्रमशाळांना टी.डी.सी.कडून होणाऱ्या आवश्यक वस्तुंच्या पुरवठ्याबाबत पडताळणी करणे.

५. योजना राबविताना आदिवासी लाभार्थी तसेच अंमलबजावणी अधिकारी यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

६. राबविलेल्या योजनांचे प्रशासकीय कामकाज स्वरुप स्थिती तपासणे.

७. आदिवासीकरिता राबवावयाच्या योजनांबाबत चांगल्या रितीने राबविण्यासाठी आदिवासींची मते/अभिप्राय अजमावणे.

८. आदिवासी लाभार्थीच्या आर्थिक स्थितीत सुधारणा, उत्पन्नाची पातळी वाढली किंवा कमी झाली याचा शोध घेणे.

९. नसल्यास त्या मागील कारणे कोणती याचा मागोवा घेणे.

प्रमुख योजना व तालुकानिहाय व्यक्तीगत प्रकरणांचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे होय.

३.२ जव्हार तालुक्यातील वाकी येथील हिंदू कोकणा जमातीचे लाभार्थी यांचा मुख्य व्यवसाय शेती या व्यतिरिक्त आदिवासी विकास महामंडळाकडून मिळालेल्या मिनीट्रकमुळे तोच भाड्याने देऊन उत्पन्नाचा दुय्यम श्रोत म्हणून वापरत आहे.

त्यांच्या मालकीची एकूण आठ एकर जमीन असून जमिनीपासून मिळणारे उत्पन्न लाभधारकास सांगता आले नाही.

लाभधारकाने आदिवासी विकास महामंडळाकडून विद्युत पंप व एकलव्य मिनीट्रक अशा दोन दोन योजनांचा लाभ घेतला आहे. आजमितीस लाभधारकांच्या विद्युत पंपाची लाईट तोडली आहे. लाभधारकाच्या म्हणण्यानुसार ६ महिने लाईट वापरुन एक वर्षाचे लाईटबिल आले. त्यामुळे लाईट बिल भरले नाही. म्हणून लाईटचे कनेक्शन तोडून टाकले आहे.

तसेच लाभार्थीने टी.डी.सी.मार्फत एकलव्य मिनीट्रक योजनेचा लाभ घेतलेला आहे. सध्या लाभार्थीकडे हा ट्रक अस्तित्वात असून दोघे भाऊ मिळून हा ट्रक रात्रंदिवस चालवितात. डिझेलचा खर्च वजा जाता रु.६०० ते ७०० एवढा आर्थिक नफा एका दिवसास होतो. हा लाभधारक स्वत: गाडी चालवितो. त्याच्याकडे जड वाहन चालविण्याचा परवाना आहे. या गाडीसाठी त्याने रु.३०,०००/- भरले व रु.६,०००/- प्रतिमाह हप्ता त्याला बसतो. दर तीन महिन्याला रु.१९,६००/- बँकेत भरावयाचे असतात. या गाडीच्या कर्जावर त्याला ८ % एवढे नाममात्र व्याज द्यावे लागते. या लाभार्थ्यास ट्रक मिळून ९ महिने झाले. या ९ महिन्यात लाभधारकाची आर्थिक परिस्थिती पुष्कळच सुधारल्याचे त्याच्या कौटुंबिक परिस्थितीवरुन व त्याच्या राहणीमानावरुन दिसून आले.

सदर लाभधारक महामंडळाच्या जव्हार केंद्रात 'भात' विकतो. हे केंद्र लाभधारकाच्या घरापासून ५ किलोमीटर अंतरावर आहे. लाभधारकाच्या गांवातच आदिवासी विकास महामंडळाने सुरु केलेले स्वस्त धान्य दुकान आहे. या दुकानातून लाभधारक साखर, गोडतेल,, गहू, रवा, मैदा या जीवनावश्यक वस्तुंची खरेदी करतो.

वरील योजनांच्या माध्यमातून लाभार्थीचे आर्थिक उत्पन्न निश्चितच वाढले आहे. याशिवाय स्वस्त धान्य दुकानात जीवनश्यक वस्तुंची खरेदी करुन त्यांची पैशांचीही बचत झाली आहे..

लाभधारक 'एकलव्य मिनी ट्रक' योजनेच्या लाभाने आनंदी असल्याचे दिसून आले आहे.

३.३ जव्हार तालुक्यातील जामसर येथील हिंदू-ठाकूर जमातीचे सदर लाभार्थी- त्यांचा मुख्य व्यवसाय शेती. लाभधारक हा सुशिक्षित असून शिक्षण एस.एस.सी.पर्यंत झाले आहे.

त्याच्या मालकीची एकूण २५ एकर जमीन असून जमिनीपासून वरई, नागली व भात हे उत्पन्न मिळते. या लाभधारकाचे एकत्र कुटुंब असून कुटुंबात एकूण २३ माणसे आहे. कुटुंबाला पुरेल एवढे धान्य घरात ठेवून उरलेले धान्य आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदी केंद्रात विकून टाकतात.

लाभार्थीस आदिवासी विकास महामंडळाकडून 'एक लव्य मिनी ट्रक योजने' अंतर्गत Mahindra Nissan हा मिनीट्रक उपलब्ध झाला आहे. हा लाभ मिळविण्यासाठी लाभधारकास रु.३०,०००/- बँकेत जमा करावे लागले. त्यानंतर रु.१९,०००/- चा पहिला हप्ता भरला. हा मिनी ट्रक मिळाल्यानंतर हा ट्रक महामंडळाच्या मालवाहतूकीसाठी वापरण्यात आला. सरासरी रु.१,४००/-रोज या लाभातून लाभधारकास उत्पन्न मिळत होते. तथापि, सध्या गाडी ४ महिन्यापासून बंद आहे. लाभधारकाचे दररोजचे फार मोठे आर्थिक नुकसान सुरु आहे. या कंपनीच्या गाडीचे स्पेअर पार्टस उपलब्ध होणे अवघड झाल्याने सदर गाडी गेले चार महिन्यापासून बंद ठेवण्यात आली आहे..

या व्यतिरिक्त लाभधारकास विद्युत पंप योजनेचाही इ.स.१९७८-७९ मध्ये लाभ झाला आहे. या विद्युतपंप योजनेमुळे लाभार्थीची पाच एकर जमीन पाण्याखाली आली आहे. या जमिनीमध्ये लाभार्थी भाजीपाल्याचे उत्पन्न घेतो.

याशिवाय सामाजिक वनीकरण विभागाकडून ५०-६० आंब्याची कलमे या योजनेचाही लाभधारकाने लाभ घेतला आहे..

लाभार्थी राहत असलेल्या गांवात आदिवासी विकास महामंडळाचे धान्य खरेदी-विक्री केंद्र आहे. या खरेदी विक्री केंद्रातून लाभार्थी साखर व तेल या जीवनावश्यक वस्तुंचा लाभ घेतो.

उपरोक्त माहितीवरुन लाभार्थी शासकीय योजनांची माहिती करुन घेणे व त्याच्या दृष्टीने उपयोगी ठरतील अशा योजनांचा लाभ घेण्यामध्ये अग्रेसर असल्याचे दिसून येते.

३.४ सदर लाभार्थी पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील राजपूर या गांवाचे आहेत. लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न रु.४,५००/- इतके असून उत्पन्नानुसार लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील गटात येतो.

लाभधारक आदिवासी विकास महामंडळालाच्या खरेदी विक्री केंद्रात हिरडा, वरई, तिळ हे धान्य व डिंक हे गौण वनौपजके दरवर्षी विकत असतो. व्यापाऱ्याला अन्नधान्य विकण्यापेक्षा महामंडळाला अन्नधान्य विकणे सोयीस्कर असल्याचे दिसून येते. याचे कारण जाणून घेतले असता महामंडळाकडून योग्य भाव मिळतो. पैसेही लगेचच मिळतात. वजनात फसवणूक होत नाही. याशिवाय व्यापाऱ्यालाही धान्य विकत असतात. व्यापाऱ्याला धान्य का विकता याची कारणे जाणून घेतली असता व्यापारी कधीही कर्ज देण्यास तयार होतो. व्यापाऱ्याचा व्याजदर भरमसाठ असला तरी पाहिजे त्यावेळी कर्ज उपलब्ध होते व कर्ज घेतल्यानंतर धान्य व्यापाऱ्यालाच विकणे हे जणू लाभधारकाचे कर्तव्यच ठरते. या कारणासाठी लाभधारक व्यापाऱ्यालाही धान्य विकतो.

लाभधारकास वरील योजनांव्यतिरिक्त आदिवासी विकास सेवा सोसायट्याकडून पावसाळ्याच्या सुरवातीस (जून ते सप्टेंबर) या कालावधीत खावटी कर्ज उपलब्ध झाले आहे. यामध्ये ९० टक्के भाग धान्य रुपाने व १० टक्के भाग रोख रुपाने देण्यात आला.

लाभधारक ज्या गांवात राहतो त्याच गांवात महामंडळाने सुरु केलेले स्वस्त धान्य दुकान आहे. गहू, तांदूळ, साखर व तेल या जीवनावश्यक वस्तुंचा लाभ लाभधारक घेत असतो.

याशिवाय लाभधारकास 'बैलजोडी' चाही लाभ झालेला आहे. कोणत्या योजनेअंतर्गत बैलजोडीचा लाभ झाला आहे हे मात्र लाभधारकास सांगता आले नाही. वरील माहितीवरुन विविध शासकीय योजनांची माहिती लाभधारकास झाली आहे व लाभ घेण्यास लाभार्थी उत्सुक असल्याचे दिसून आले.

३.५ पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील चिखली या गांवचे संबंधित लाभार्थी हिंदू महादेव कोळी या जातीचे आहेत. त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.६,०००/- असून उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्र रेषेखालील गटात होतो.

सदर लाभधारकास आदिवासी विकास महामंडळामार्फत स्वतःचा छोटा व्यवसाय सुरु करण्याच्या योजनेअंतर्गत 'लाऊडस्पीकर' या योजनेचा लाभ झाला. लग्नसराईमध्ये व घरातील विशेष प्रसंगी लाऊडस्पीकरच्या व्यवसायास जोरदार मागणी असते. परंतु पावसाळ्यात हा व्यवसाय ४ महिने बंदच ठेवावा लागतो.

लाऊडस्पीकर व्यतिरिक्त अन्य लाभ लाभधारकास झालेला नाही.

लाभधारक महामंडळाला स्वतःच्या शेतात पिकणारी वरई, विकतो व हिरडाही विकतो. हिरड्यासाठी लाभार्थ्यास चांगला भाव मिळत असल्याचे लाभार्थीने सांगितले. तथापि हे महामंडळाचे खरेदीकेंद्र त्याच्या गांवापासून खूप दूर आहे. २० कि.मी. अंतरावर असणाऱ्या खरेदी केंद्रात माल वाहून नेणे हे मोठे जिकीरीचे काम आहे. त्यामुळे लाभधारक कधीकधी स्थानिक व्यापाऱ्यालाही आपले अन्नधान्य विकतो.

सदर लाभधारकाच्या गांवात महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळाचे स्वस्त धान्य विक्रीचे दुकान आहे. गहू, तांदूळ, रॉकेल, तेल या जीवनावश्यक वस्तुचा लाभार्थी लाभ घेत असतो.

तसेच पावसाळ्यामध्ये लाभधारकास जुलै ते ऑक्टोबर या कालावधीसाठी महामंडळामार्फत खावटी कर्ज योजनेचाही लाभ मिळाला. यामध्ये ९०% लाभ वस्तुस्वरुपात व १० टक्के लाभ हा पैशाच्या स्वरुपात देण्यात आला.

लाभधारकाने महामंडळाचे खरेदी केंद्रे गांवाजवळ असणे आवश्यक आहे, असे मत दिले. खरेदी केंद्रे गांवापासून दूर अंतरावर असल्याने केंद्रापर्यंत धान्य वाहजू देणे हे अत्यंत जिकीरीचे होते. गाड्यांची सोय नाही. त्यामुळे धान्य नाईलाजास्तव व्यापाऱ्याला विकावे लागते, असे मत लाभार्थीने दिले.

३.६ पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील राजेवाडी येथील हा लाभार्थी महादेव कोळी जमातीचा असून त्याचे वार्षिक उत्पन्न रु.४,८००/- एवढे आहे. सदर लाभार्थी सध्या मयत आहे.

लाभार्थीने आदिवासी विकास महामंडळाकडून 'स्वस्त धान्य दुकानाचा' लाभ घेतला होता. तथापि, आजमितीस स्वस्त धान्य दुकान अस्तित्वात नाही. त्याच्या पत्नीला स्वस्त धान्य दुकानाचा लाभ घेतला होता का? घेतला असल्यास कधी याविषयीही काहीही सांगता आले नाही.

मुलाखतीत लाभधारकाच्या पत्नीने सांगितले की, त्यांच्या शेतात तयार झालेला माल हिरडा, वरई,तीळ हे महामंडळाला व व्यापाऱ्यानाही विकतात. ही खरेदी केंद्रे त्यांच्या गांवापासून १० कि.मी.अंतरावर असल्याने मालवाहतूकीमध्ये खूप खर्च होतो.

याशिवाय महामंडळाच्या खावटी कर्जाचा लाभ मिळतो का अशी विचारणा केली असता लाभधारकाच्या पत्नीने अशाप्रकारचे कर्ज मिळते असे ऐकल्याचे सांगितले. मात्र आजपर्यंत अशाप्रकारच्या योजनेचा लाभ त्यांच्या कुटुंबाला मिळाला नसल्याचे मयत लाभार्थीच्या पत्नीने सांगितले. लाभधारकाची पत्नी अशिक्षित असल्याने व घराव्यतिरिक्त अन्य इतर कोणत्याच बाबी माहिती नसल्याने ती कोणतीच माहिती व्यवस्थितपणे देऊ शकली नाही व शासकीय योजनांचा लाभ झाला किंवा कसे याबाबत नीट माहिती देऊ शकली नाही.

३.७ आंबेगांव तालुक्यातील राजपूर येथील महादेव कोळी जमातीचे सदर लाभार्थी त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.४,०००/-असून उत्पन्नानुसार सदर लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील गटात येतात. त्यांना आदिवासी विकास महामंडळाकडून दुग्ध व्यवसाय विकास या योजनेखाली 'म्हैस' मिळाली व 'स्वस्त धान्य दुकान' या योजनेचाही लाभ झाला. सदर लाभार्थीचे दुकान चालू स्थितीत असून गहू, तांदूळ, साखर, तेल या जीवनश्ययक वस्तुंचा पुरवठा स्वस्त धान्य दुकानामार्फत होतो.

लाभार्थी त्याच्या शेतात पिकणारे तीळ, वरई हे धान्य व हिरडा, डिंक हे वन उत्पादन आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदी केंद्रात विकतो. लाभार्थीच्या गांवापासून अवघ्या ३ कि.मी.अंतरावर हे खरेदी केंद्र असल्याने लाभधारकास धान्य वाहतूकीची गंभीर समस्या निर्माण होत नाही.

याशिवाय लाभधारकास आदिवासी विकास महामंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या 'खावटी कर्ज' योजनेचाही लाभ झाला आहे.

लाभधारकास मिळालेलया वरील योजनांच्या आधारे लाभधारकाची आर्थिक स्थिती पुष्कळच सुधारल्याचे दिसून आले व लाभधारकही अधिक योजना घेण्यास उत्सुक असल्याचे दिसून आले.

३.८ ठाणे जिल्हयातील जव्हार तालुक्यातील वडोली या गांवचे सदर लाभार्थी कोकणा जमातीचे असून उत्पन्नानुसार त्यांच समावेश दारिद्र्य रेषेखालील गटात होतो.

सदर लाभार्थीस सात वर्षापूर्वी 'वीजपंप' या योजनेचा लाभ झाला. सदर लाभार्थ्याचा विद्युत पंप आज मितीसही चालू स्थितीत आहे. सध्या त्यांच्या विद्युत पंपाच्या सहाय्याने त्याच्या शेतात वांगी, टोमॅटो, मूळा, चवळी, लिंबू, फणस, उडीद ही पीके घेण्यात येतात. याशिवाय भाजीपाला घेण्यात येतो. वीजपंपामुळे लाभार्थीला खूप आर्थिक फायदा झाला. याशिवाय लाभार्थी दरवर्षी खावटी कर्ज योजनेचाही लाभ घेतो.

या व्यतिरिक्त लाभार्थीच्या गांवात स्वस्त धान्य दुकान असून लाभधारक या दुकानांमधून जीवनश्यक वस्तुंचा लाभ घेत असतो.

३.९ वरील वैयक्तिक प्रकरणांचा अभ्यास हा 'लाभार्थीच्या' संदर्भात करण्यात आला. यापुढील वैयक्तिक प्रकरणांचा अभ्यास हा संस्थात्मक असल्याने 'आश्रमशाळांचा' करण्यात आला आहे.

शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा कापरा, ता.बाबूळगांव, जि.यवतमाळ येथील ही आश्रमशाळा श्री.एस.एम.आठवले हे १९८१ पासून गेली १४ वर्षे मुख्याध्यापक म्हणून या आश्रमशाळेवर काम करीत आहेत. शाळेमध्ये २२८ मुले व १७० मुली अशी एकूण ३९८ विद्यार्थी संख्या आहे व त्यांना शिकविण्यासाठी एकूण २९ अध्यापक आहेत. त्यापैकी १४ अध्यापक प्रशिक्षित असून १५ अध्यापक हे अप्रशिक्षित आहेत.

आश्रमशाळेस वरील ३९८ विद्यार्थ्यांसाठी गहू, तांदूळ, तुरडाळ, चनाडाळ,.गोडेतेल, शेंगदाणे, वाटाणे, हळद, मीठ, मसाला, साखर, मिरचीपावडरइ.जीवनश्यक वस्तुंचा पुरवठा आदिवासी विकास महामंडळामार्फत केला जातो. आश्रमशाळेला कोणत्या जीवनश्यक वस्तुंची गरज आहे, याची मागणीची नोंद एप्रिल ते डिसेंबर महिन्यात करण्यात येते. आदिवासी विकास महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या मालाचा दर्जा सर्वसाधारण असतो. त्यातूनही निकृष्ट प्रतीचा माल असला अथवा मागणीपेक्षा कमी (माल) वस्तु आल्यानंतर त्याबाबत

प्रादेशिक व्यवस्थापक व प्रकल्प अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविण्यात येते. या तक्रारीवर दोन आठवड्यांनी कार्यवाही होऊन मुख्याध्यापक व अधीक्षकांना एकतर्फी दोषी ठरवून कार्यवाही केली जाते. या प्रकारामुळे बऱ्याचदा मुख्याध्यापक तक्रार करण्यास धजावत नाहीत.

महामंडळामार्फत अधिसूचित वस्तु व्यतिरिक्त अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा केला जात नाही. याचे कारण अधिसूचित वस्तुंचाच पुरवठा नीट होत नाही तर त्या व्यतिरिक्त फळे, भाजीपाला, अंडी या नाशवंत वस्तुचा पुरवठा अशक्य आहे.

आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांची मागणी अशी आहे की, महामंडळाकडून आश्रमशाळा सुरु होण्यापूर्वीच वस्तुंचा पुरवठा व्हावा म्हणजे हे अन्नधान्य उन्हात वाळवणुकीस ठेवून मग हवाबंद डब्यात ठेवता येईल. जेणेकरुन अळी, कीडा, मुंगीपासून अन्नधान्यांचे संरक्षण होईल.

उत्कृष्ट दर्जाच्या वस्तुंचा पुरवठा झाल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य तंदुरुस्त राहील. त्यामुळे त्याच्या बुध्दीस चालना मिळेल..

३.१० शासकीय पोस्टबेसिक आश्रमशाळा निगडोळ नाशिक जिल्हयातील दिंडोरी तालुक्यातील ही आश्रमशाळा. शाळेत २५४ मुले व १५१ मुली मिळून ४०५ विद्यार्थी आहेत. शाळेत एकूण २३ शिक्षक आहेत. पैकी १० प्रशिक्षित आहेत व १३ अप्रशिक्षित आहेत. याशिवाय १३ इतर कर्मचारी आहेत.

या शाळेतील एकूण ४०५ विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढा गहू, तांदूळ, तुरडाळ, मसूरडाळ, उडीद डाळ, मूग, शेंगदाणे, गोडेतेल, खोबरेल तेल, मसूरडाळ, हरबरा डाळ, हरभरे, मठ, चवळी, रवा, पोहे, तिखट, हळद, मीठ , जिरे, मोहरी, साबण, वनस्पती तूप इ.जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा केला जातो. हा पुरवठा विद्यार्थी संख्या व त्यांच्या आहार प्रमाणानुसार केला जातो. यासाठी जून ते एप्रिल मध्ये मागणी नोंदवावी लागते. मागणी नोंदविल्यानंतर कमीत कमी एक महिन्यानंतर जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा केला जातो. जर यदाकदाचित आश्रमशाळेला वस्तुंचा पुरवठा होण्यास विलंब लागला तर प्रकल्प अधिकारी कार्यालयाची परवानगी घेऊन शेजारील आश्रमशाळेकडून वस्तु घेतल्या जातात.

महामंडळाकडून पुरविल्या जाणाऱ्या वस्तुंचा दर्जा उत्तम असल्याचा व सर्व माल चांगला असल्याचा निर्वाळा मुख्याध्यापकांनी दिला. अधिसूचित मागणी व्यतिरिक्त महामंडळाकडून अन्य वस्तुंचा पुरवठा महामंडळाकडून होत नाही.

निगडोळ आश्रमशाळेतील मुख्याध्यापक व अधीक्षकांनी महामंडळाच्या धान्य पुरवठा प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले. तथापि, धान्य ज्या पिशव्यांमधून (बारदान) पुरविण्यात येते, त्याचा दर्जा चांगला व टिकाऊ असावा, असे मत मुलाखतीत मुख्याध्यापकांनी दिले.

३.११ शासकीय आश्रमशाळा चांगणी, ता.जव्हार, जि.ठाणे येथील ही आश्रमशाळा. शाळेत १८२ मुले व ५८ मुली अशी एकूण २४० विद्यार्थी/विद्यार्थीनी सध्या शिक्षण घेत आहेत. शाळेत एकूण १५ शिक्षक असून त्यातील ६ शिक्षक प्रशिक्षित आहेत व नऊ शिक्षक अप्रशिक्षित आहेत. याशिवाय आश्रमशाळेत ९ इतर कर्मचारी आहेत.

आश्रमशाळेतील २४० विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढा जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा आदिवासी विकास महामंडळाकडून होत असतो. त्यामध्ये खालील वस्तुंचा पुरवठा होतो. उदा.तांदूळ, डाळी, कडधान्य, गोडेतेल, तिखट, साबण, (अंगाचा व कपड्याचा) खोबरेल तेल, शेंगदाणे, [illegible], झाडू, [illegible], मेणबत्ती या जीवनाश्यक वस्तुंचा पुरवठा होतो.

या आश्रमशाळेचे मुख्याध्यापक तीन महिन्यासाठी पुरेल एवढया वस्तुंची मागणी वर्षातून तीन वेळा करतात. ही मागणी मे महिन्यात, सप्टेंबर व डिसेंबर महिन्यात केली जाते व मागणी नोंदविल्यानंतर साधारण १५ दिवसांत माल नोंदविला जातो. तातडीची गरज असेल तर प्रकल्प अधिकाऱ्यांना त्वरीत सूचना देऊन तातडीने व्यवस्था केली जाते. महामंडळाकडून पुरविण्यात येणारा माल उत्तम असतो. दर्जाही चांगला असतो. निकृष्ट प्रतीचा माल महामंडळास परत केला जातो. मागणीपेक्षा अपूरा माल महामंडळाकडून पाठविला गेला, तर प्रकल्प अधिकाऱ्यामार्फत प्रादेशिक व्यवस्थापकांकडे तक्रार नोंदविली जाते. या तक्रारीची त्वरीत चौकशी होऊन निकृष्ट माल बदलून दिला जाते व नोंदविलेल्या मागणीएवढा माल पुरविला जातो.

## प्रकरण क्र.४

## सर्वेक्षणात गोळा केलेल्या सांख्यिकी माहितीचे पृथःकरण

क्षेत्रीय पाहणीमध्ये मिळालेल्या ६५ लाभार्थीच्या माहितीचे पृथःकरण करण्यात आले. ही माहिती तक्ता क्र.४.१ पासून तक्ता क्र.४. ११ पर्यंत दिलेली आहे.

### *भाग-१*

*लाभार्थीची माहिती*

४.१ पाहणीमध्ये निवडलेल्या ६५ लाभार्थी हे शेतीवर उपजीविका करतात व सगळे लाभार्थी (१००%) दारिद्र्य रेषेखालील असल्याचे आढळले. शेतीबरोबरच लाभार्थीचा जोडव्यवसाय ही असल्याचे आढळून आले आहे.

तक्ता क्र.४.१

लाभार्थीचे योजनानिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | लाभार्थीचे योजनानिहाय वर्गीकरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकाधिकार | विद्युत/ ऑईलपंप | खावटी कर्ज | स्वस्त धान्य दुकानाचा लाभ | न्यू.बजेट (फिरता निधी) | एकलव्य मिनी ट्रक |
| १. | पुणे | ४७ | ४७ | १ | २२ | ४७ | ४७ | - |
| २. | ठाणे | १८ | १० | १३ | ११ | ९ | ७ | २ |
| एकूण | | ६५ | ५७ | १४ | ३३ | ५६ | ५४ | २ |
| टक्केवारी | | १००% | ८७.६९ | २१.५३ | ५०.७६ | ८६.१५ | ८३.०७ | ३.०७ |


उपरोक्त तक्त्यामध्ये आदिवासी विकास महामंडळामार्फत लाभार्थीनी ज्या योजनांचा लाभ घेतला त्या योजनांची माहिती दिली आहे.

१. उपरोक्त तक्त्यामध्ये एकाधिकार खरेदी केंद्रांना माल विकून ८७.६९% लाभार्थीनी या योजनेचा लाभ घेतला. यामध्ये वरई, नागली, भात, तूर, उडीद, ही कृषी उत्पादने तर डिंक, हिरडा अशा प्रकारच्या कृषी उत्पादनाचा समावेश होता. या योजनेमध्ये सर्वाधिक लाभधारक सहभागी झाले. आदिवासी विकास महमंडळाकून धान्याला व वनोत्पादनास चांगला भाव मिळत असल्याने व त्वरीत पैसे मिळत असल्याने लाभधारक 'खरेदी केंद्र' दूर अंतरावर असले तरी या योजनेचा लाभ घेण्यास पुढे येत असल्याचे आढळून आले. याशिवाय लाभधारक व्यापाऱ्यांनाही माल विकत असल्याचे आढळून आले. व्यापारी पाहिजे त्यावेळी लाभधारकास कर्ज उपलब्ध करुन देत असल्याने लाभधारक व्यापाऱ्यांनाही धान्य विकत असतो.

Statement showing various responses given by the beneficiaries during the survey.

| District | No. Of Beneficiaries | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total Beneficiaries Surveyed | Selling Food Grain To TDC | Selling Minor Forest Produce to TDC | Received Payment Immediately | Received Delayed Payment | Selling to TDC is Profitable |
| Pune | 47 | 47 | 32 | 43 | 4 | 47 |
| Thane | 18 | 10 | 0 | 10 | 0 | 10 |
| Total | 65 | 57 | 32 | 53 | 4 | 57 |

Chart Showing Responses Given By Surveyed Beneficiaries.



२. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासींना जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा होण्यासाठी उघडण्यात आलेल्या स्वस्त धान्य केंद्राचा ८६.१५% लाभार्थीनी लाभ घेतल्याचे ठाणे व पुणे जिल्हयातील पाहणीमध्ये आढळून आले.

३. खावटी कर्ज योजनेचा लाभ ५०.७६% लाभार्थीनी घेतल्याचे पाहणीमध्ये आढळून आले. उर्वरित ४९% लाभार्थींना खावटी कर्जाचा लाभ का घेता आला नाही, याची पाहणी केली असता ही खावटी पावसाळ्याच्या सुरवातीस मिळावयास हवी. तथापि, भर पावसाळ्यात मिळणारी खावटी नेण्यास लाभार्थी पुढे येत नाही. मिळणारी खावटी अत्यंत तुटपुंजी व पुरेशी नसते. वाहतुकीची सोय नसल्याने लाभधारक खावटी नेण्यास पुढे येत नाही. या कारणामुळे जवळ जवळ निम्मे लाभधारक या योजनेपासून वंचित असल्याचे पाहणीमध्ये आढळून आले.

४. पाहणीसाठी निवडलेल्या लाभधारकामध्ये एकलव्य मिनी ट्रक योजनेचा लाभ घेतलेले ठाणे जिल्हीयातील २ लाभधारक आढळून आले. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभधारकांमध्ये स्पर्धेचे वातावरण निर्माण झाल्याचे आढळून आले. निश्चित व भरपूर उत्पन्न मिळवून देण्याचा खात्रीशीर लाभ असल्याने आदिवासी बेरोजगार युवक हा लाभ घेण्यास उत्सुक असल्याचे आढळून आले.

५. न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत १९९२-९३ पूर्वी ८३.०७% लाभधारकांनी लाभ घेतलयाचे आढळले. यामध्ये रोजगार वाढविणाऱ्या, उत्पन्न वाढविणाऱ्या व मानवसाधन संपत्तीचा विकास करणाऱ्या योजनांचा समावेश होतो. स्थानिक गरजेनुसार आवश्यक योजना न्युक्लिअस बजेट अंतर्गत फिरत्या फंडातून घेतल्या गेल्या.

४.२ आदिवासी विकास महामंडळाकडून धान्य खरेदी व विक्री हे महत्वाचे कार्य केले जाते. आदिवासी शेतकऱ्यांकडे तयार होणारा माल विकत घेणे व आदिवासी शेतकऱ्यांस योग्य भाव देणे हे महत्वाचे उदिष्टय यातून साध्य होते. एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत हे साध्य होते. या एकाधिकार खरेदी योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थींची माहिती पुढील तक्तयात दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र.४.२

एकाधिकार खरेदी अंतर्गत लाभार्थींची माहिती

| अ. क्र | जिल्हा | एकूण लाभार्थी | एकाधिकार खरेदी योजना | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी | कृषी उत्पन्न विकणारे लाभार्थी | गौण वनोपज विकणारे लाभार्थी | विक्रीनंतर लगेच किंमत घेतलेले लाभार्थी | विक्रीनंतर उशिरा किंमत घेतलेले लाभार्थी | महामंडळास माल विकणे फायदेशीर | महामंडळास माल विकणे तोट्याचे |
| १. | पुणे | ४७ | ४७ | ४७ | ३२ | ४३ | ४ | ४७ | - |
| २. | ठाणे | १८ | १० | १० | - | १० | - | १० | - |
| एकूण | | ६५ | ५७ | ५७ | ३२ | ५३ | ४ | ५७ | - |
| टक्केवारी | | १००% | ८७.६९ | ८७.६९ | ४९.२३ | ८१.५३ | ६.१५ | ८७.६९ | - |

उपरोक्त तक्त्यामध्ये एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत महामंडळास माल विकणे फायदेशीर आहे किंवा कसे, माल विकल्यावर पैसे त्वरीत मिळतात का ? इ.बाबींची माहिती देण्यात आली आहे.

या योजनेचा एकूण ८८% लाभार्थीनी लाभ घेतला आहे व हे सर्व लाभार्थी आपल्या शेतात तयार होणारा शेत माल उदा.नागली, भात, भुईमूग, तिळ इ.ची विक्री महामंडळास करीत असतात. या व्यतिरिक्त यातील ४१.२३% लाभार्थी गौण वनोउत्पादनांची विक्री महामंडळास करीत असल्याचे पाहणीत आढळून आले. यामध्ये हिरडा, डिंक, मध इ.वनौपजाचा समावेश होतो. या आदिवासी शेतकऱ्यांना माल विकल्यानंतर महामंडळाकडून त्वरीत पैसे मिळतात काय याची पाहणी केली असता ८१.५३% लाभधारकांना विक्रीनंतर त्वरीत पैसे मिळत असल्याचे पाहणीत आढळून आले. तर ६.१५% लाभधारकांना विक्रीनंतर काही दिवसांनी पैसे हातात मिळत असल्याचे पाहणीत आढळले.

सर्व आदिवासी लाभार्थीना महामंडळास माल विकणे परवडत असलयाचे पाहणीत आढळून आले.

४.३ लाभधारकांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी त्यांचे उत्पन्नात निश्चित वाढ करण्यासाठी महामंडळामार्फत विद्युत पंप/तेलपंप या योजनेचा लाभ दिला जातो. लाभधारक आपल्या शेतातील विहिरीवर, शेताजवळील नदी, नाला, तलाव, धरण अथवा कॅनॉलवर विद्युत पंप बसवून घेऊन वर्षातून दुबार पिके अथवा फळे, भाज्या यांची लागवड करु शकतो. अशाप्रकारचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र.४.३

विद्युतपंप/तेलपंप मिळालेल्या लाभार्थीचे वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | विद्युतपंप/तेलपंप मिळालेले लाभार्थी | पैकी कार्यान्वित पंप | अकार्यान्वित पंप | योजनेमुळे आर्थिक लाभ झालेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | ४७ | १ | १ | ० | १ |
| २. | ठाणे | १८ | १३ | ११ | २ | ११ |
| एकूण | | ६५ | १४ | १२ | २ | १२ |
| टक्केवारी | | १०० | २१.५३ | १८.४६ | ३.०७ | १८.४६ |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे ४७ लाभार्थीमध्ये केवळ १ लाभार्थीस (२.१२%) लाभार्थीस या योजनेचा लाभ झाल्याचे आढळून आले. तथापि, ठाणे जिल्हयात १८ लाभार्थी मागे १३ लाभार्थीनी (७२%) या योजनेचा लाभ घेतल्याचे प्रत्यक्ष पाहणीत आढळून आले. येथे ठाणे जिल्हयातील लाभार्थींनी आपल्या शेतात केळी, चिकू, भाजीपाला इ.पिके घेतली असलयाचे प्रत्यक्षात दिसून आले. लाभधारक या योजनेमुळे अतिशय खूष/आनंदी असल्याचे दिसून आले. कित्येक लाभधारकांची जमीन पाण्याखाली आल्याचे चित्र ठाणे जिल्हयात दिसून आले.

एकूण टक्केवारीमध्ये २१.५३% लाभार्थीना विद्युत पंप/तेलपंपाचा लाभ झाल्याचे दिसून आले व त्यापैकी १८.४६% लाभार्थीचे पंप सद्यस्थितीत कार्यान्वित आहेत. उर्वरित ३.०७% लाभार्थीनी विद्युत पंप विकून टाकणे, नादुरुस्त असणे, विद्युत कनेक्शन न मिळणे इ.कारणामुळे बंद असल्याचे आढळून आले. पैकी ज्यांचे

विद्युत पंप/तेलपंप चालू आहेत. अशा लाभधारकांच्या उत्पन्नात निश्चित स्वरुपात आर्थिक लाभ होत असल्याचे त्यांच्या राहणीमानावरुन व घरातील सामानावरुन दिसून येत होते.

तक्ता क्र.४.४


खावटी योजनेचा लाभ मिळालेले लाभार्थीचे वर्गीकरण

| अ.क्र. | जिल्हा | एकूण लाभार्थी | खावटी कर्ज प्राप्त झालेले लाभार्थी | खावटी कर्जफेड केलेला लाभार्थी | खावटी कर्जफेड न केलेले लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | ४७ | २२ | - | - |
| २. | ठाणे | १८ | ०२ | १ | १ |
| एकूण | | ६५ | २४ | १ | १ |
| टक्केवारी | | १०० | ३६.९२ | १.५३ | १.५३ |

पावसाळ्यातील दिवसात आदिवासी जवळील अन्नधान्याचा साठा संपलेला असतो. रोजगार मिळविण्यासाठी बाहेर पडणे या दिवसात शक्य होत नाही. म्हणून कुपोषणापासून लहान मुलांचे संरक्षण व्हावे व मोठ्या माणसांनाही अन्नधान्य मिळावे, यासाठी आदिवासी विकास महमंडळ सहकारी संस्थाच्या माध्यमातून खावटी कर्ज (Consumption Finance) ही योजना राबविते. या योजनेचा लाभ ठाणे व पुणे जिल्हयातील ३७% लाभार्थींनी घेतलयाचे आढळून आले व केवळ १.५३% लाभार्थीनीच कर्जफेड केलयाचे पाहणीत आढळले. लाभार्थींना देण्यात येणारे हे कर्ज त्यांची गरज ओळखून व ऐनपावसाळयात देण्यात येते तरी या कर्जाची अथवा योजनेचा लाभ घेण्यास पुढे येणाऱ्या लाभार्थीचे प्रमाण एवढे कमी का याची लाभार्थीकडून कारणे जाणून घेतली असता अतिवृष्टी व डोंगरदऱ्यातील वास्तव्यामुळे तसेच सोसायटी ऑफिसपासून घराचे अंतर जास्त असल्याने लाभार्थींना खावटी घरी घेऊन जाणे शक्य होत नाही.

शासनाकडून मिळणारी खावटी योजना अत्यंत तुटपुंजी व उशिरा मिळते. यासाठी वारंवार तालुक्याच्या गांवी जावे लागते. सोसायटी ऑफिसमध्येही चकरा माराव्या लागतात. या कारणामुळे लाभधारक या योजनेचा लाभ घेण्यास पुढे येत नाहीत.

खावटी कर्ज घेतलेल्या लाभार्थीमध्येही कर्जफेड करणाऱ्या लाभार्थीचे प्रमाण नगण्य असल्याचे आढळून आले. हे प्रमाण नगण्य असल्याची कारणे जाणून घेतली असता भविष्यात हे कर्ज माफ होईल अशी आशा व कर्ज फेडले नाहीतरी पुढच्या वर्षी खावटी मिळतेच अशा वृत्तीमुळे लाभधारक खावटी कर्ज फेडण्याच्या बाबतीत उदासिन असल्याचे आढळून आले आहे.


Chart Showing Schemewise No. of Beneficiaries From Pune & Thane District
No. of Beneficiaries
70
60
50
40
30
20
10
0
Pune
Thane
Total
District
Total Beneficiaries Surveyed
Monopoly Procurement
Oil Engine/Elec. Pump
Khavati Loan
Food Grain Supply(Ration)
Nucleus Budget
Mini Truck

## महामंडळाच्या १९९२-९३ मधील योजनांवार आढावा

वरील भाग-१ मध्ये महामंडळाबाबतच्या योजनांची लाभधारकांनी घेतलेल्या लाभाची माहिती दिली आहे. भाग-२ मध्ये आदिवासी विकास महामंडळाच्या योजनांवर आढावा अभ्यासिला आहे.

तक्ता क.४.५

एकाधिकार व आधारभूत किंमत खरेदी योजना

| अ. क्र. | प्रादेशिक विभाग | दि.१.७.९१ ते ३०.६.९२ अखेर खरेदी | | | दि.१.७.९२ ते ३०.९.९२ अखेर खरेदी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वजन (क्विंटल) | किंमत (लाखांत) | टक्केवारी | वजन (क्विंटल) | किंमत (लाखांत) | टक्केवारी |
| १. | जव्हार | ५०११८ | २०२.२६ | ७.२२ | ६१८२३ | २६५.७५ | ६.७८ |
| २. | नाशिक | ११३६५७ | ६३१.२७ | २२.५५ | १६३६२० | ७४१.४० | १८.९६ |
| ३. | नंदूरबार | ६६५०३ | ४४९.७३ | १६.०५ | २७०६०८ | ९०१.५१ | २३.०६ |
| ४. | जुन्नर | ५०६७५ | २२७.४६ | ७.७५ | ३७४८.६ | १६१.४६ | ४.१२ |
| ५. | यवतमाळ | ५८१२५ | ५०१.५३ | १७.९० | ८४८२८ | ५६३.८३ | १४.४१ |
| ६. | भंडारा | ३१०५० | ८५.०९ | ३.०३ | ६५९२९ | १९६.०२ | ५.०१ |
| ७. | चंद्रपूर | ३८८०५ | १७८.८४ | ६.३६ | ५७४४९ | २०५.०९ | ५.२४ |
| ८. | गडचिरोली | १६७४०७ | ५३१.१८ | १८.९८ | २८२५८६ | ८७१.५२ | २२.२९ |
| | एकूण | ५९६३४० | २७९७.५६ | १००% | १०२४३२९ | ३९०६.५८ | १००% |

उपरोक्त योजना ५९३ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या सहकार्याने व महामंडळाची केंद्रे मिळून ६७३ खरेदी केंद्रामार्फत राबविली असून त्याची तुलनात्मक माहिती वरील तक्तयात दिली आहे.

तक्त्यात निर्देशित केल्याप्रमाणे इ.सन १९९१-९२ अखेर सर्वाधिक खरेदी (२२.५५%) नाशिक प्रादेशिक विभागामार्फत झालेली आहे. त्यानंतर अनुक्रमे, गडचिरोली, (१८.९८%) व यवतमाळ (१७.९०%) खरेदी झालेली आहे.

संदर्भीत वर्षात सर्वात कमी मालाची खरेदी भंडारा जिल्हयात झाली आहे.

सन १९९१-९२ शी तुलना करता १९९२-९३ अखेर नंदूरबार विभागामध्ये सर्वाधिक खरेदी झाल्याचे दिसते. त्या खालोखाल अनुक्रमे, गडचिरोली व नाशिक जिल्हयात उत्पादित मालाची खरेदी झाल्याचे दिसते.

सर्वात कमी खरेदी जुन्नर, भंडारा व चंद्रपूर प्रादेशिक विभागात होत असल्याचे वरील आकडेवारीवरुन दिसून येते. तथापि, तुलनेने १९९२-९३ अखेर खरेदीचे प्रमाण अधिक असल्याचे वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

४.४ खावटी कर्ज योजनेअंतर्गत १९८८-८९ पासून ते १९९३ पर्यंत किती खर्च झाला व त्याची वसूली कितपत झाली याची टक्केवारी खालील तक्ता क्र.४.६ मध्ये दिसून येते.

तक्ता कृ.४.६

खावटी कर्जाचे वर्षनिहाय वाटप व वसूलीची टक्केवारी

| अ. क्र. | वर्ष | कर्ज वाटप | | | ३०.९.९३ अखेर वसूली कर्ज रुपये | ३०.९.९३ अखेर येणे बाकी कर्ज रुपये | वसूलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी संख्या | लाभार्थीची टक्केवारी | रक्कम | | | |
| १. | १९८८-८९ | १३,५६१ | ५.१७% | २०,०७,६५४ | ५,३७,३१७ | १४,७०,३३८ | २६.७५ |
| २. | १९८९-९० | ६२,५०६ | २३.६८% | ८५,५५,३३९ | ११,९८,७७५ | ७३,५६,५६४ | १४.०१ |
| ३. | १९९०-९१ | ४१,४५७ | १५.७०% | ६२,३९,०७४ | ९,५७,७०५ | ५२,८१,३६९ | १५.३५ |
| ४. | १९९१-९२ | ४३,२४१ | १६.३८% | ८२,०८,५१० | ३०,४१,९५७ | ५१,६६,५५३ | ३७.०५ |
| ५. | १९९२-९३ | १,०३,०२७ | ३९.०४% | ४,०९,२४,३५७ | ६०,२८,००१ | ३,४८,९६,३५६ | १४.७२ |
| ६. | १९९२ | ७८,०४८ | - | ३,१०,३९,३७१ | ६०,२३,७९६ | २,५०,१५,५७५ | २०.०० |
| ७. | १९९३ | २४,९७३ | - | ९८,८४,९८६ | ४,२०५ | ९८,८०,७८१ | ३.०० |
| अ.नं.१ ते ५ ची एकूण बेरीज | | २,६३,८८२ | १००% | ६,५९,३४,९३४ | १,१७,६३,७५५ | ५,४१,७१,१८० | १७.८४ |

उपरोक्त तक्त्याचे विश्लेषण केले असता १९८८-८९ ते १९९२-९३ या पाच वर्षात २,६३,८८२ एवढया संख्येतील लाभार्थ्यांनी खावटी कर्ज योजनेचा लाभ घेतलयाचे दिसते व यासाठी रु.६,५१,३४,९३४ एवढी रक्कम खर्च झाल्याचे दिसून येते. वरील खर्च झालेल्या रक्कमेपैकी सर्वात जास्त रक्कम रु.१९९२-९३ या आर्थिक वर्षात खर्च झाल्याचे दिसते व ३९.०४% लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिल्याचे दिसून येते. सन १९८८-८९ मध्ये केवळ ५.१७% लाभार्थीनाच केवळ योजनेचा लाभ दिल्याचे आढळून येते.

खावटी कर्ज दिलेल्या रक्कमेतून ३०.९.९३ पर्यंत किती रक्कम वसूल झाली याची पडताळणी केली असता १९८८-८९ यावर्षी १३,६५१ लाभार्थ्यांना रु.२०,०७,६५४ रक्कमेचा लाभ देऊन २६.७५% रक्कमेची वसूली झाल्याचे दिसून येते. याउलट १९९२-९३ यावर्षी ३९.०४% लाभार्थ्यांना ४,०१,२४,३५७ रक्कमेचा लाभ देऊन वसूलीचे प्रमाण अत्यंत नगण्य १४.७२% असल्याचे दिसून येते.

४.५ वसूलीची टक्केवारी पाहिली असता सन १९९१-९२ यावर्षी वसूली त्यातल्या त्यात बरी ३७.०५% असल्याचे निदर्शनास येते. उर्वरित वर्षामध्ये वसूलीचे प्रमाण २६% च्या वर गेले नसल्याचे निदर्शनास येते. वरील तक्त्यातील वसूलीचे प्रमाण एवढे कमी असण्याची कारणे-

१. लाभधारक सावकाराकडून कर्ज काढतो. सावकार लाभधारकाच्या खानपटीस बसूनच कर्जाची वसूली करतो. त्यामुळे शासकीय कर्ज वसूल करण्यासाठी सावकाराइतकी खंबीर यंत्रणा नसल्याने शासकीय कर्जातील वसूलीचे प्रमाण अल्प असलयाचे दिसून येते. तसेच शासकीय कर्ज फेडण्याबाबत लाभार्थी नेहमी दुय्यम स्थान देत असल्याने आदिवासी विकास महामंडळातील खावटी कर्ज योजनेचा वसूल अल्प असल्याचे दिसून येते.

४.६ आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी, आदिवासी उद्योजकांना स्वतःचा उद्योग सुरु करता यावा यासाठी शासनाने आदिवासी उपयोजना क्षेत्रात सन १९८१-८२ पासून तर आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासीकरिता सन १९८६-८७ पासून *न्युक्लिअस बजेट* ही योजना राबविण्यासाठी दिली होती. शासनाने शासन निर्णय दिनांक १२ मे, १९९२ अन्वये महामंडळामार्फत राबविण्यात येणारी कर्ज आणि अनुदान योजना बंद करुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेमार्फत आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे नियंत्रणाखाली *न्युक्लिअस बजेट* अंतर्गत अनुदान योजना राबविली जात आहे.

न्युक्लिअस बजेट कर्ज योजना महामंडळामार्फत राबविणे बंद केले असले तरी आदिवासी क्षेत्रात सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक मजबूत आणि व्यापक करण्याच्या दृष्टीने शासनाने एक विशेष कृती कार्यक्रम तयार करुन बहुतांश आदिवासींची आर्थिक परिस्थिती फारच कमकुवत असल्याने त्यांना स्वस्त धान्य दुकान चालविणे शक्य व्हावे या उद्देशाने सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात नवीन आदिवासी रास्तभाव दुकानदारांना आदिवासी विकास विभागातर्फे खेळते भांडवल म्हणून आर्थिक सहाय्य देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शासनाच्या विशेष कृती कार्यक्रमाखाली न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकान सुरु करण्यासाठी आदिवासी लाभार्थीस कमाल रु.१०,०००/- मर्यादेपर्यंत ५०% अनुदान व ५०% बिनव्याजी कर्ज देण्यात येते.

या योजनेअंतर्गत कर्ज भागाचे वाटप आदिवासी विकास महामंडळाकडून करण्यात येते. तर ५०% प्रमाणातील अनुदान प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात

येते. खालील तक्ता क्र.४.७ मध्ये न्युक्लिअस बजेट कार्यक्रमांतर्गत प्रादेशिक विभागावर कर्जवाटपचा १९९२-९३ या वर्षाचा तपशील व वसूल रक्कम यांची आकडेवारी दिलेली आहे.

तक्ता क्र.४.७

न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत कर्जवाटप व वसूली दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालय | कर्जवाटपाचा तपशील | | | एकूण वाटप रुपयांत | वसूली रक्कम | वसूलीची टक्केवारी | येणे बाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी | कर्जभाग रक्कम | अनुदान रक्कम | | | | |
| १. | नाशिक | ४९ | २४५००० | २४५००० | ४९०००० | १३५०० | २.७५ | २३१५० |
| २. | नंदूरबार | ९६ | ४८०००० | ४८०००० | ९६०००० | ६१३० | ०.६३ | ४७३८५ |
| ३. | जव्हार | ३०९ | १३१२१८१ | १३२२०३७ | २६३४२१८ | २३०३०३ | ८.७४ | १०८१८५ |
| ४. | जुन्नर | ३३ | १६५००० | १६५००० | ३३०००० | ८७५० | २.६५ | १५६,२५ |
| ५. | यवतमाळ | १२० | ५०५००० | ५०५००० | १०१०००० | १३८०० | १.३६ | ४९१२० |
| ६. | भंडारा | १२१ | ३८६००० | ३८६००० | ७७२००० | २०३०५ | २.६३ | ३६,५६,९ |
| ७. | चंद्रपूर | ११९ | ५८०२०० | ५८०२०० | ११६०४०० | ३९१८५ | ३.३७ | ५४१०१ |
| ८. | गडचिरोली | ७० | १७५००० | १७५००० | ३५०००० | ४४०१ | १.२५ | १७०५५ |
| | एकूण | ९१७ | ३८,४८,३८१ | ३८,५८,२३७ | ७७,०६,६१८ | ३,३६,३७४ | ४.३६ | ३५,१२,०० |

उपरोक्त तक्तयात विषद केलेली माहिती ही १९९२-९३ या आर्थिक वर्षातील आहे. संबधित वर्षात न्युक्लिअस बजेट योजनेवर जव्हार प्रादेशिक क्षेत्रात सर्वाधिक खर्च झाला आहे. एकूण लाभार्थीपैकी जवळ जवळ ३४% (३०९)लाभार्थीनी जव्हार प्रकल्पात न्युक्लिअस बजेट योजनेचा लाभ घेतलेला आहे. उर्वरित लाभार्थीमध्ये अनुक्रमे भंडारा, यवतमाळ, चंद्रपूर या प्रादेशिक क्षेत्रातील लाभार्थींनी या योजनेचा लाभ घेतल्याचे दिसते. सर्वात कमी (३.५९%) जुन्नर प्रादेशिक विभागातील लाभार्थीनी लाभ घेतल्याचे दिसते.

संबंधित वर्षात रु.७७,०६,६१८/- न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत खर्च झाला आहे. त्यामध्ये ५०% अनुदान व ५० टक्के कर्ज या स्वरुपात वाटण्यात आले.

कर्ज वाटपानंतर वसूलीचे प्रमाणांची आकडेवारी तपासली असता जव्हारमध्ये जास्तीत जास्त ८.७४% वसूली झाल्याचे निदर्शनास आले. उर्वरित सर्व प्रादेशिक कार्यालयांतर्गत न्युक्लिअस बजेट कर्जाचा वसूल हा फक्त १.२५% ते३ % च्या आसपास आहे.

वरील आकडेवारीवरुन असे अनुमान काढता येईल की, आदिवासी विकास महामंडळाकडून दिल्या जाणाऱ्या ५० टक्के कर्ज रक्कमेपैकी केवळ ४.३६ % रक्कमेचा वसूल झाला आहे. उर्वरित ४५.६४% रक्कमेचा तोटा महामंडळास सहन करावा लागला आहे.

तक्ता कृ.४.६ मध्ये देखील हीच वस्तुस्थिती निदर्शनास येते. एकूण वाटप झालेल्या रक्कमेच्या केवळ १७.८४% रक्कमेचा वसूल झाला आहे. उर्वरित ८२.१६% रक्कमेचा भुर्दंड महामंडळास सोसावा लागला आहे.

वरील आकडेवारीचे विश्लेषण केले असता वसूलीपेक्षा लाभार्थीकडून येणे बाकीची रक्कम प्रचंड असल्याचे दिसते. वरील आकडेवारीवरुन वसूलीच्या बाबत लाभधारक रक्कम परत फेडण्याबाबत उदासिन असल्याचे दिसते. याच्या कारणांची पडताळणी केली असता लाभधारकाला लाभ दिल्यानंतर त्यापासून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही, म्हणून पर्यायाने लाभधारक कर्जाचे थकबाकीदार राहत असावेत, असे वाटते.

४.७ अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानदानांना पूर्वी तालुका पातळीवरील गोदामातून शिधा वस्तुची उचल करावी लागत होती. त्यामुळे बऱ्याचवेळा वाहनांच्या अभावी दुर्गम भागात वेळीच शिधा वस्तुंची वाहतूक होत नव्हती. त्यामुळे आदिवासी व दुर्गम भागात वेळेतवर शिधा वस्तु मिळत नव्हत्या असे होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाने 'द्वार वितरण व्यवस्था योजना' आदिवासी विकास महामंडळामार्फत सुरु केली आहे. सदर योजनेमार्फत शिधा वस्तु या थेट स्वस्त धान्य दुकानापर्यंत महामंडळाने सुपूर्त केलेल्या वाहनामार्फत वाहतूक केली जात आहे. सदर योजनेअंतर्गत आर्थिक वर्षात ३,०४,८००.६२ क्विंटल मालाची वाहतूक केली आहे.

'द्वार वितरण व्यवस्था योजने' अंतर्गत प्रादेशिक कार्यालय निहाय माहिती पुढील तक्त्यात दिलेली आहे.

तक्ता क्र.४.८

'द्वार वितरण व्यवस्था योजनेअंतर्गत वाहतूक केलेल्या वस्तु (क्विंटलमध्ये)

| अ.क्र. | प्रादेशिक कार्यालय | द्वार वितरणासाठी उपलब्ध वाहने | टक्केवारी | वाहतूक केलेली वस्तुंची मात्रा (क्विंटलमध्ये) |
|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | ४ | १०.३५ | ३१५५६.०० |
| २. | नंदूरबार | ७ | २२.७० | ६९२०३.०० |
| ३. | जव्हार | ७ | २१.३८ | ६५१८५.०० |
| ४. | गडचिरोली | ४ | ७.१८ | २१८९५.५७ |
| ५. | भंडारा | २ | ५.२२ | १५८८१.४५ |
| ६. | यवतमाळ | ३ | १८.५६ | ५६५५८.८५ |
| ७. | चंद्रपूर | ९ | १४.६१ | ४४५२०.७५ |
| | एकूण | ३६ | १०० | ३,०४,८००.६२ |

उपरोक्त तक्त्यावरुन द्वार वितरण व्यवस्थेसाठी चंद्रपूर प्रादेशिक कार्यालयांतर्गत द्वार वितरण व्यवस्थेसाठी सर्वाधिक नऊ (९) वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. या नऊ वाहनामार्फत एकूण वाहतूक झालेल्या मालाच्या १४.६१% मालाची (४४५२०.७५) क्विंटल मालाची वाहतूक केली.

याउलट स्थिती यवतमाळ जिल्हयाची दिसून आली. यवतमाळ प्रादेशिक कार्यालयांतर्गत ३ वाहने उपलब्ध करुन दिलेली आहेत.तथापि, एकूण वाहतूक झालेल्या मालाच्या १८.५६% क्विंटल माल द्वार वितरण व्यवस्थेपर्यंत वाहून नेण्याचे दिसून येते. चंद्रपूर जिल्हयात जास्त वाहने असली तरी तुलनात्मकदृष्टया त्यांनी वाहतूक केलेल्या मालाचे प्रमाण मात्र अल्प आहे.

नंदूरबार, जव्हार या प्रादेशिक कार्यालयांतर्गत सात वाहने दिलेली आहे व त्यांनी अनुक्रमे २२.७०% व २१.३८ टक्के एकूण मालाची वाहतूक केली आहे. उर्वरित प्रादेशि क कार्यालयामध्ये वाहनांची संख्या व वाहतूक झालेल्या मालाची संख्याही कमी असल्याचे निदर्शनास आले आहे.

४.८ एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केलेला माल विक्री करतांना किफायतशीर भाव मिळतील असे धोरण ठेवूनच महामंडळाने माल विक्रीचे प्रयत्न केलेले आहेत. मागील काही वर्षाचा अनुभव लक्षात घेता असे दिसून आले की, बाजारभावात सारखी चढ उतार होत असते. त्याची वेळीस दखल घेऊन महामंडळाने माल विक्रीचे व्यवहार व लवचिक धोरण आर्थिक वर्षात आखले आणि विक्रीचा उच्चांक गाठला. तरीही काही मालास मागणी नसल्याने माल विक्रीस अडचण निर्माण झाली.

प्रादेशिक कार्यालयातील शिल्लक साठा, खरेदी , एकूण मालासाठी व एकूण विक्रीची टक्केवारी खालील तक्त्यात दिलेली आहे.

विभागवार कर्ज वाटपाचा तपशील खालील तक्ता क्र.४.९ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता क्र.४.९

**न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत कर्जवाटप, अनुदान व वसूली व येणे रक्कमेनुसार वर्गीकरण दर्शविणारा तक्ता- १९९२-९३**

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालय | कर्जवाटपाचा तपशील | | | एकूण वाटप रक्कम | वसूल रक्कम | वसूलीची टक्केवारी | येणे बाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभार्थी | कर्जभाग रक्कम | अनुदान रक्कम | | | | |
| १. | नाशिक | ४९ | २४५००० | २४५००० | ४९०००० | १३५०० | २.७५ | २३१५०० |
| २. | नंदूरबार | ९६ | ४८०००० | ४८०००० | ९६०००० | ६१३० | ०.६३ | ४७३८७० |
| ३. | जव्हार | ३०९ | १३१२१८१ | १३२२०३७ | २६३४२१८ | २३०३०३ | ८.७४ | १०८१८७८ |
| ४. | जुन्नर | ३३ | १६५००० | १६५००० | ३३०००० | ८७५० | २.६५ | १५६२५० |
| ५. | यवतमाळ | १२० | ५०५००० | ५०५००० | १०१०००० | १३८०० | १.३६ | ४९१२०० |
| ६. | भंडारा | १२१ | ३८६००० | ३८६००० | ७७२००० | २०३०५ | २.६३ | ३६५६९५ |
| ७. | चंद्रपूर | ११९ | ५८०२०० | ५८०२०० | ११६०४०० | ३९१८५ | ३.३७ | ५४१०१५ |
| ८. | गडचिरोली | ७० | १७५००० | १७५००० | ३५०००० | ४४०१ | १.२५ | १७०५९९ |
| | एकूण | ९१७ | ३८,४८,३८१ | ३८,५८,२३७ | ७७,०६,६१८ | ३,३६,३७४ | ४.३६ | ३५,१२,००७ |

उपरोक्त तक्त्यामध्येसन १९९२-९३ ची न्युक्लिअस बजेट योजनेची अंतर्गत सर्व प्रादेशिक कार्यालयांतर्गत लाभार्थीची संख्या त्यांना कर्ज व अनुदानापोटी देण्यात आलेली रक्कम व वसूली तसेच महामंडळास लाभार्थीकडून किती रक्कम येणे बाकी आहे, या सर्वांचा तपशील देण्यात आला आहे.

तक्त्यात दर्शाविल्याप्रमाणे संदर्भीत वर्षात एकूण ११७ लाभधारकांनी महाराष्ट्र राज्यात न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत उत्पन्न मिळवून देणाऱ्या योजनांचा फायदा घेतला आहे. त्यासाठी एकूण रु.७७,०६,६१८/- खर्च झाले. त्यातील रु.३८,५८,२३७/- ही अनुदानाची रक्कम प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून खर्च झाली. तर कर्जापोटी खर्च झालेले रु.३८,४८,३८१/- महामंडळाने लाभधारकांना कर्जापोटी वाटप केले. खर्च झालेल्या रक्कमेपैकी केवळ ४.३६% रक्कमेचा एकूण वसूल झालेला आहे. ५०% कर्ज रक्कमेपैकी ४.३६% वसूली अतिशय कमी वाटते.

वरील तक्त्यावरुन जुन्नर प्रादेशिक कार्यालयांतर्गत सर्वाधिक लाभार्थ्यांनी लाभ घेतला असल्याचे दिसते.

तक्ता क्र.४.१०

शिल्लक साठा, खरेदी, एकूण मालसाठा व एकूण विक्रीची टक्केवारी निहाय वर्गीकरण

| अ. क्र. | प्रादेशिक कार्यालयाचे नांव | दि.३०.९.९३ अखेर शिल्लक | | ३०.९.९३ अखेर खरेदी | | एकूण मालसाठा | | एकूण विक्री | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्विंटल | किंमत (लाखांत) | क्विंटल | किंमत (लाखांत) | क्विंटल | किंमत (लाखांत) | क्विंटल | किंमत (लाखांत) |
| १. | जव्हार | १४४०५.०० | ७२.४१ | ६१८२३ | २६५.७५ | ७६२२८.०० | ३३८.१६ | ५७०४१.४६ (७४.८३) | ३४२.७२ (१०१.१३) |
| २. | नाशिक | ८७५८३.६४ | ४४०.४९ | १६३६२० | ७४१.४० | २५१२०३.६४ | ११८१.८९ | १९८७१९.७० (७९.१०) | ११३५.१० (९६.०३) |
| ३. | नंदूरबार | ६५९०५.०० | ५८१.३१ | २७०६०८ | ९०१.५१ | ३३६५१३.०० | १४८२.८२ | २७२३६६.३१ (८०.९३) | १२५१.८३ (८४.३६) |
| ४. | जुन्नर | ३३५८६.५२ | १४१.०४ | ३७४८६ | १६१.४६ | ७१०७२.५२ | ३०२.५० | ६३८९५.३३ (८९.९०) | २८७.११ (९४.८७) |
| ५. | यवतमाळ | ४८१३४.८९ | ४५६.५५ | ८४८२८ | ५६३.८३ | १३२९६२.८९ | १०२०.३८ | ८४२५१.०३ (६३.३६) | ७२५.०९ (७१.१५) |
| ६. | भंडारा | १२००७.०० | ४१.१५ | ६५९२९ | १९६.०२ | ७७९३६.०० | २३७.१७ | ७१४३५.९० (९१.६५) | २५१.१० (१०५.८३) |
| ७. | चंद्रपूर | २९८४१.८३ | २४९.९३ | ५७४४९ | २०५.०९ | ८७२९०.८३ | ४५५.०२ | ६६९९७.५१ (७६.७५) | ३१६.५४ (६९.४४) |
| ८. | गडचिरोली | १०२३११.४१ | ३८९.६० | २८२५८६ | ८७१.५२ | ३८४८९७.४१ | १२६१.१२ | ३१५११७.२५ (८१.८७) | ११०५.६० (८७.६२) |
| | एकूण | ३९३७७५.२९ | २३७२.४८ | १०२४३२९ | ३९०६.५८ | १४१८१०४.२९ | ६२७९.०६ | ११२९८३२.४९ | ५४१६.०९ (८६.२५) |

*टीप- एकूण विक्री क्विंटल कॉलममधील कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.*

उपरोक्त तक्त्यावरुन ३०.६.९२ अखेर रुपये २२७२.४८ लाख किंमत ३९३७७.२५ क्विंटल माल शिल्लक होता. ३०.९.९३ अखेर रु.३९०६.५८ लाख किंमतीचा १०२४३२९ क्विंटल मालाची खरेदी करण्यात आली. अशाप्रकारे रु.६२७९.०६ लाख किंमतीचा १४१८१०४.२९ क्विंटल एकूण मालसाठा असल्याचे वरील आकडेवारीवरुन दिसून येते.

एकूण मालसाठ्यापैकी विक्री झालेल्या मालाचा तपशील पुढीलप्रमाणे-

१. उपलब्ध आकडेवारी वरुन यवतमाळ प्रादेशिक कार्यालय वगळता सर्व प्रादेशिक कार्यालयांनी आपल्या जवळील मालसाठ्यातील ७५% पेक्षा जास्त मालाची विक्री केल्याचे निदर्शनास येते. यामध्ये भंडारा प्रादेशिक कार्यालयाकडून ९१.६५% मालाची व जुन्नर प्रादेशिक कार्यालयाकडून ८९.९०% मालाची व गडचिरोली प्रादेशिक कार्यालयाकडून ८१.८७% मालाची विक्री झाल्याचे दिसून येते.

२. एकूण ११२९८३२.४० क्विंटल विकलेल्या मालातून महामंडळास रु.५४१६.०९ लाख (८६.२५) रुपये मिळाले. यातही जव्हार प्रादेशिक कार्यालयाकडून ७४.८३% मालाची विक्री होऊन १०१.१३% विकणी किंमत मिळाली. ही किंमत एकूण मालसाठ्याच्या किंमतीपेक्षाही जास्त असल्याने जव्हार प्रादेशिक कार्यालयास एकाधिकार विक्रीतून फायदा झाल्याचे निश्चितपणे अनुमान काढता येईल. वरीलप्रमाणेच स्थिती भंडारा प्रादेशिक कार्यालयाचीही असल्याचे विश्लेषणाअंती आढळून आले. उर्वरित प्रादेशिक कार्यालयांनीही विक्रीपोटी किफायतशीर भाव मिळाला असल्याचे वरील आकडेवारीवरुन दिसून येते.

मोठ्या प्रमाणात विक्री होण्याची प्रमुख कारणे विक्रीसाठी नियोजनबद्द कार्यक्रम तसेच प्रादेशिक व्यवस्थापकांना वेळोवेळी मार्गदर्शन केल्याचे दिसते.

## ४.९ *शासनाचे अर्थसहाय्य :-*

शासन महामंडळास दरवर्षीच अनुदानाच्या स्वरुपात मदत देत असते. १९९२-९३ या वर्षी महामंडळास आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने नेहमीच्या अनुदानाव्यतिरिक्त शासनाने अधिक भागभांडवल वाढवून दिले. तसेच केंद्र शासनानेही महामंडळास अल्पशी मदत भागभांडवलाच्या रुपाने केली. या सर्व शासन अनुदानाची वर्षनिहाय माहिती (रुपये लक्ष) पुढील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्र.४.११**

**शासनाचे आर्थिक सहाय्या (वर्षनिहाय) नुसार वर्गीकरण**

| अ.नं. | तपशील | १९९०-९१ | १९९१-९२ | १९९२-९३ |
|---|---|---|---|---|
| १. | व्यवस्थापकीय अनुदान | ४६७.६२(७४.९२%) | ५१०.६८(६८.६१%) | ७२५.१५(३७.६७%) |
| २. | खरेदी खर्च अनुदान | ६७.६१ (१०.७७%) | ५२.१८ (६.९९%) | ८९.६२ (४.६८%) |
| ३. | तोटे भरपाई अनुदान | ८८.३४ (१४.३१%) | १८०.९८ (२४.४०%) | २८७.७१ (१४.८९%) |
| ४. | भागभांडवल | | | |
| अ. | महाराष्ट्र शासन | - | - | ८००.००(४१.५६%)) |
| ब. | केंद्र शासन | - | - | २४.०० (१.२२%)) |
| एकूण | | ६२३.५७(१००%) | ७४३.८४(१००%) | १९२६.४८ (१००%) |

महामंडळास दरवर्षी अर्थसहाय्य कोणकोणत्या मार्गाने उपलब्ध होते. याचा तपशील उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आला आहे. या आकडेवारीवरुन १९९०-९१ मध्ये महामंडळास-

१. महामंडळास १९९०-९१ मध्ये ७४.१२% रक्कम व्यवस्थापकीय अनुदानापोटी मिळाली होती. दरवर्षी ही रक्कम कमी कमी होत १९९२-९३ मध्ये ३७.६९% व्यवस्थापकीय अनुदान प्राप्त झाले.

२. खरेदी खर्च अनुदानाचे बाबतीतही वरीलप्रमाणेच स्थिती दिसून येते. १९९०-९१ मध्ये १०.७७% १९९१-९२ मध्ये ६.९९% व १९९२-९३ मध्ये ४.६४% रक्कम खरेदी खर्च अनुदान या पोटी महामंडळास मिळाले आहेत.

३. महामंडळास अपेक्षेपेक्षा जास्त तोटा झाल्यास शासनाकडून यासाठी नुकसान भरपाई दिली जाते. १९९०-९१ यावर्षी एकूण अनुदानाच्या १४.३१% रक्कम भरपाईपोटी दिले होते. १९९१-९२ मध्ये महामंडळास तुलनेने जास्त तोटा झाल्याने त्यावर्षी ही रक्कम वाढवून २४.३०% एवढी वाढविण्यात आली. त्यापुढील वर्षी १९९२-९३ मध्ये महामंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारुन १४.८१% एवढे तोटे भरपाई अनुदान महामंडळास शासनाकडून मिळाले.

४. शासनाकडून दरवर्षी महामंडळास दिल्या जाणाऱ्या अनुदानामध्ये वाढ होत गेल्याचे वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

## प्रकरण क्र.५

## निरीक्षणात्मक बाबी

आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला असता आदिवासी शेतकरी बांधवांसाठी व आश्रमशाळेसाठी आदिवासी विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळया योजना, कार्यक्रमांची उपयुक्तता व आवश्यकता लक्षात येते. पण त्यातील त्रुटी व मर्यादाही ठळकपणे जाणवतात. आदिवासी विकास महामंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांचेकडून माहिती घेण्यात आली. तसेच योजना राबविणारे अधिकारी, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व वसतीगृह अधीक्षक यांना भेटून त्यांच्या मुलाखती घेऊन विविध योजना विषयीच्या प्रतिक्रीया आजमावण्यात आल्या . या सर्व बाबी निरीक्षणाद्वारे पुढीलप्रमाणे मांडण्यात आल्या आहेत.

१. *विद्यार्थीनिहाय शिधा प्रमाण:-*

आश्रमशाळेने मागणी केलेला माल आदिवासी विकास महामंडळाकडून साधारणपणे १ महिन्याच्या आसपासच्या कालावधीपर्यंत आश्रमशाळेकडे पाठविला जातो. सर्वसाधारणपणे एका इयत्तेत ४० विद्यार्थी संख्या आहे, असे गृहित धरुन आश्रमशाळेकडून वस्तुंची मागणी (अन्नधान्य, किराणा, स्टेशनरी) केली जाते.

तथापि, इयत्ता ५ वी पासून विद्यार्थी संख्या ४० न राहता पुढील इयत्तामध्ये विद्यार्थी संख्या २० विद्यार्थ्यांच्या आसपास शिल्लक राहते व मागणी प्रत्येक वर्गात ४० विद्यार्थ्यांप्रमाणे केली जाते.

मुख्याध्यापक, प्रकल्प अधिकारी तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून 'शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार (विद्यार्थीनिहाय शिधा प्रमाण) पुरवठा ' करण्याचे तपासून पाहिले जात नाही. केवळ आश्रमशाळेने मागणी केली तेवढाचा पुरवठा केला जातो.

२. *महामंडळाकडून वस्तु पुरवठा:-*

आश्रमशाळांना पुरविण्यात येणारा माल शाळांना स्विकारावा लागतो. कधी कधी हा माल निकृष्ट प्रतीचा व खराब असतो. अशावेळी अन्नधान्यात तूट येते. क्वचित प्रसंगी माल चांगला नसेल तर बदलून देण्यात येतो पण त्यामध्ये वेळेचा अपव्यय होतो. माल पुरविण्यापूर्वी आश्रमशाळांना व प्रकल्प अधिकाऱ्यांना मालाचा नमुना (सॅम्पल) दाखविल्यास भविष्यात वेळेचा व निकृष्ट मालाचा अपव्यय टाळता येईल.

३. *आश्रमशाळांना महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या मालास दिरंगाई:-*

कधी कधी आश्रमशाळांना पुरविण्यात येणारा माल मागणी नोंदवूनही त्वरीत मिळत नाही व व्यवस्थापनामध्ये अडचण निर्माण होते.

अशावेळी मुख्याध्यापकांना प्रकल्प अधिकाऱ्यांच्या परवानगीने दुसऱ्या आश्रमशाळांकडून माल आणून आश्रमशाळेची गरज भागवावी लागते. तसेच किरकोळ वस्तुंसाठी देखील महामंडळाकडून वस्तु मिळण्याची वाट पहावी लागते व त्या संदर्भातील तक्रारीची दखल महामंडळांकडून घेतली जात नाही.

आश्रमशाळेस पुरविण्यात येणारा माल प्रत्येक वेळी नवीन असतोच असे नाही. तसेच ज्या पोत्यामध्ये, बारदानामधून माल पुरविण्यात येतो, ती बारदानाची पोती चांगल्या दर्जाची नसतात. पर्यायाने बारदानाच्या छिद्रातून अन्नधान्याची गळती होते. किडे, उंदीर वा घुशीचाही प्रादुर्भाव होतो. कधी कधी आश्रमशाळांकडून मागणी केल्याप्रमाणे मालाचा पुरवठा केला जात नाही.

४. *एकलव्य मिनी ट्रक योजना:-*

आदिवासी विकास महामंडळामार्फत एकलव्य मिनी ट्रक योजना देण्यात येते. तथापि, ठाणे जिल्हयातील जामसर येथील लाभार्थीचा एक ट्रक बिघडून चार महिने झाले.

स्पेअर पार्टस अभावी सदर लाभार्थीचा ट्रक गेली चार महिन्यापासून गॅरेजला पडून आहे. सदर ट्रकचे पार्टस फक्त बेंगलोर येथेच उपलब्ध होतात.

५. *संयुक्त योजनेमध्ये वेळेचा अपव्यय:-*

संयुक्त रित्या राबवावयाच्या योजनामध्ये वेळेचा अपव्यय व कार्यक्षमता राहत नसल्याचे कार्यान्वय अधिकाऱ्यांच्या मुलाखतीमध्ये सांगण्यात आले. उदा.विद्युत पंप योजना प्रकल्प अधिकाऱ्यांकडून विद्युत पंप प्रकरण मंजूर करुन घेणे, आदिवासी विकास महामंडळाकडून विद्युत पंप खरेदी करुन लाभार्थ्यांच्या शेतात बसविणे, प्रकल्प अधिकाऱ्यांनी वीजेची डिमांडनोट प्राप्त करणे व डिमांड नोटची रक्कम भरणे नंतर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे संपर्क साधणे व विद्युत मंडळाने विद्युत कनेक्शन देणे इ. पर्यायाने गेल्या ५ वर्षात जव्हार प्रादेशिक कार्यालयामार्फत १२०७ वीजपंप बसविण्यात आले. पैकी ८९८ प्रत्यक्षात कार्यान्वित झाले व ३०७ विद्युत पंप आवश्यक कागदपत्रांअभावी प्रलंबित (बंद) असल्याचे सर्वेक्षण पाहणीत आढळून आले.

६. *एकाधिकार खरेदी योजना लाभार्थ्यांना वरदान:-*

आदिवासींना त्यांनी विक्री केलेल्या मालाचे वजन किती आहे, हे समजत नव्हते. कारण त्यापूर्वी करी पध्दतीने धान्य विक्री केली जात होती. पैसे हातात किती दिले याचे मोजमाप करता येत नव्हते. सावकार सांगेल तेच वजन, सावकार देईल तेच पैसे परंतू

एकाधिकार खरेदी केंद्रामुळे चोख वजन व वेळच्यावेळी व बरोबर पैसे दिले जातात.त्यामुळे शेतकरी आनंदी दिसला. सध्या शेतकरी खरेदी केंद्रावर येऊन धान्याच्या भावाची विचारणा करतो. त्याचे शोषण थांबले असून तो साक्षर झाला आहे.

७. *योजनांची वसूली कमी :-*

आदिवासी विकास महामंडळाच्या कर्ज व अनुदानाच्या योजनांबाबत कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी सावकारासारखी प्रभावी यंत्रणा नाही. पर्यायाने आदिवासी विकास महमंडळाच्या बहुसंख्य योजनांची वसूली अत्यंत कमी असल्याचे निदर्शनास येते.

त्यामुळे मुदतीत कर्जफेड झाली तर आदिवासी विकास महामंडळाकडून केवळ नोटीस पाठविण्यात येते.

८. *खावटी कर्ज वसूलीची अनिश्चिती पध्दती :-*

खावटी कर्ज वाटप व वसूलीबाबत निश्चित अशी पध्दती ठरवून देण्यात आली नाही. तसेच खावटी कर्ज वाटप विहित कालावधीत होत नसल्याचे पाहणीत आढळून आहे. त्याची कारणे विषद करताना कार्यान्वय अधिकाऱ्यांनी सांगितले की, -

अ. <u>कमाल मर्यादा पत्रके संस्थेकडून वेळीच सादर केली जात नाही.</u>

ब. कमाल मर्यादा पत्रके छाननी करुन समितीकडे मंजूरीस पाठविल्यानंतर मंजूर होऊन येण्यास उशीर लागतो. मालवाहतूक करतांना आदिवासी क्षेत्रात अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. उदा.वाहतूकीची साधने अपूरी. त्यातून पावसाळ्यामध्ये वाहतूक करणे अवघड होते. नदी-नाल्यांना पूल नसणे, कच्चा रस्ता असणे इ.

९. *प्रतवारीची साधने व प्रशिक्षणाचा अभाव :-*

आदिवासी शेतकऱ्यांकडील खराब माल साफ करुन घेण्यासाठी खरेदी केंद्रावर चाळण्या उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्रतवारीकारास माल स्वच्छ करुन घेता येत नाही. प्रतवारीसाठी अशाप्रकारे आवश्यक असणारी साधने पुरविली जात नाहीत. प्रतवारीकारांना आवश्यक असलेले प्रशिक्षण दिले जात नाही. बाजारात प्रतवारीकारास अनेक लोकांसमोर प्रतवारी करावी लागते. यासाठी प्रतवारीकारावर काही लोकांकडून दबावही आणला जातो. वरील कारणामुळे खरेदी झालेल्या मालाची प्रत बिघडते. स्टॅंण्डर्ड राहत नाही.

१०. *महामंडळाकडून सर्व प्रकारच्या मालाची खरेदी:-*

महामंडळाकडून काही ओल्या मालाची खरेदी करण्यात येते. उदा.भुईमूगाच्या शेंगा, अशा मालांवर मोठ्या प्रमाणावर घट येते. माल सुकविण्यासाठी आदिवासी विकास महामंडळाकडे यंत्रणा नसल्याने काही माल कुजुन जातो.

दुसरा काही माल उदा- उडीद, खुरासणी तूर शेतकरी खळयात मळणी करुन विक्री करतात. अशा मालामध्ये मातीचे, कचऱ्याचे प्रमाण जादा असते.

विक्रीस येणारा सर्व माल प्रतवारीकारास उपदलालाना (Sub Agent) खरेदी करावाच लागतो. खराब, ओला अशा सर्व प्रकारचा माल महामंडळाकडून खरेदी केला जातो.

११. *गवत खरेदी योजनेची अकार्यक्षमता:-*

ज्या उद्देशाने महामंडळाकडून गवत खरेदी योजना चालू करण्यात आली होती, त्या उद्देशापासून शासन व महामंडळ परावृत्त झाल्याचे दिसून येते. वास्तविक गवत खरेदी योजना ही खऱ्या गरीब आदिवासी बांधवाच्या फायद्याची होती व गरीब, भूमीहिन, अल्पभूधारक आदिवासी बांधवाच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीने फायद्याची होती. मात्र सदर योजनेमुळे गरीब आदिवासींचा फायदा झालेला आहे काय हे न पाहता योजनेस तोटा येत असल्याने खरेदीच स्थगित करण्यात आली. गवत खरेदीमध्ये तोटा येण्याची जी प्रमुख कारणे आहेत, ती प्रामुख्याने -

विक्री होण्यास बराच कालावधी लागतो. काही माल तर दोन दोन वर्षे पडून राहतो. त्यामुळे बँकेकडून घेतलेली कर्जाची रक्कम फेडण्यास विलंब लागल्याने बँकेस मोठ्या प्रमाणावर व्याज द्यावे लागते. मागील सहा वर्षात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस व्याजापोटी अदा केलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| सन १९८४-८५ | रुपये ८८ लाख |
| सन १९८५-८६ | रुपये ७२ लाख |
| सन १९८६-८७ | रुपये ५८ लाख |
| सन १९८७-८८ | रुपये १०५ लाख |
| सन १९८८-८९ | रुपये १०९ लाख |
| सन १९८९-९० | रुपये ६८लाख |
| सन १९९०-९१ | रुपये ६४ लाख |

१४. *मार्केट सेस वरील खर्च:-*

एकाधिकार खरेदी योजनेत ज्या शेत व जंगल मालाची खरेदी करण्यात येते, अशा खरेदी रक्कमेवर कृषी उत्पन्न बाजार समितीस कायद्याप्रमाणे सेसपोटी मार्केटयार्ड, पिण्याच्या पाण्याची सोय , आवक नोंदणी, इ. प्रकारची कामे करावयाची असतात. परंतू आदिवासी उपयोजना क्षेत्रात महामंडळाची १०% खरेदी केंद्रे अशी आहेत की, जेथे कृषी उत्पन्न बाजार समितीची मार्केटयार्ड नाहीत व कृषी उत्पन्न बाजार समितीकडून कोणत्याच प्रकारची कामे केली जात नाहीत. असे असून सुध्दा केवळ कायदा आहे. म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीस लाखावर रक्कम सेस व सुपरव्हिजन फी पोटी अदा केले जातात. यात बदल होणे आवश्यक आहे.

१५. *गोदांची गैरव्यवस्था व गोदांमाचे भाडे:-*

एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केलेल्या मालाची साठवणूक सब एजंट संस्थांच्या गोदामामध्ये केली जाते. माल साठवणुकीसाठी महामंडळास लाखो रुपये भाडे द्यावे लागते. सब एजंट संस्थांची गोदामे बांधून बारा वर्षे झाली आहेत. त्यातील काही गोदामे पावसाळ्यात गळतात. काही गोदामातील फरशा तुटलेल्या आहेत. त्यामुळे उंदीर, घुशी मुळे मालांचे नुकसान होते. खरेदी चालू असतानाच गोदामात जागा नसल्याने बराच माल उघड्यावर पडून असतो. अशा मालाचा विमाही नसतो.

१६. *धान्याची भरडाई :-*

एकाधिकार खरेदी योजनेत खरेदी केलेल्या मालाची भरडाई करावी लागते. उदा.भात तूर, हरबरा, मूग इ. व नंतर हा माल आश्रमशाळेस पुरवावा लागतो. परंतू जव्हार खेरीज इतर ठिकाणी महामंडळाच्या स्वतःच्या अशा गिरण्या (Mills) नसल्याने खाजगी गिरणी मालकाकडून वरील मालाची भरडाई वेळेत व योग्य प्रकारे होत नाही.

पर्यायाने शासकीय आश्रमशाळांना मुदतीत पुरवठा करण्यास अडचण निर्माण होते.

१७. *नादुरुस्त वाहनामुळे होणारा तोटा:-*

महामंडळाच्या मालकीची अंदाजे २१ ट्रॅक्टर्स व सात ट्रक्स आहेत. दरवर्षी वाहने आर.टी.ओ.यांचे कार्यालयाकडून पास करुन घ्यावी लागतात. त्यासाठी वाहनांची दुरुस्ती करुन घ्यावी लागते. अशा वाहन दुरुस्तीसाठी प्रादेशिक व्यवस्थापक यांना अंदाजे रु.१०,०००/- पर्यंत अधिकार दिलेले आहेत. या खर्चाच्या मर्यादेत वाहनांची दुरुस्ती होत नसल्याने दुरुस्तीसाठी प्रस्ताव मुख्यालयाकडे पाठवावे लागतात. मात्र असे प्रस्ताव महिनोनमहिने मंजूरीसाठी मुख्यालयात पडून असतात.

अशाप्रकारे वर्षातून सर्वसाधारणपणे तीन ते चार महिने कामाविना जागेवर वाहने बंद असतात. शेवटी दुरुस्तीवर व्हायचा तो खर्च होतोच. मात्र वाहने तीन ते चार महिने कामाविना जागेवर उभी राहिल्याने वाहनांच्या उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होतो.

१८. *माल विक्रीचे चुकीचे धोरण:-*

एकाधिकार खरेदी योजनेमध्ये खरेदी केलेल्या मालाची जाहीर लिलावो विक्री करण्याची पध्दत आहे. मालाची विक्री करतांना ती बी.ई.पी (मालाची खरेदी किंमत + व्यापारी खर्च+ मालातील घट + नफा) दराने करण्याची पध्दत आहे. अशाप्रकारे विक्री केल्यास योजनेस तोटा येण्याची शक्यता कमी असते. तर माल विक्रीच्या चुकीच्या धोरणामुळे अशाप्रकारे तोटा येण्याची शक्यता असते. अशाप्रकारे चुकीची धोरणे अनुसरल्याने योजनेस येणाऱ्या तोट्यांची कारणे पुढीलप्रमाणे असावीत.

अ. *मार्केट संशोधन नाही-* मालाची केलेली विक्री व त्या मालास मिळालेले प्रति क्विंटल भाव हे योग्य आहेत किंवा नाही हे ठरविण्यासाठी बाजारभावाची माहिती संकलित करणारी यंत्रणा महामंडळाने उभारलेली नाही. खरेदी विक्री करणाऱ्या मालास विविध ठिकाणी रोजचे बाजारातील दर काय होते, याचे दप्तर महामंडळाकडून तयार केले जात नाही.

ब. बी.ई.पी. दराने विक्री धोरणातील त्रुटी-

काही वेळेस खरेदी मालाची बी.ई.पी.कमी असते. मात्र त्याच मालाचे बाजारभाव अधिक असतात. अशावेळेस बी.ई.पी.दराने विक्री होणे महामंडळास तोट्याचे होते व माल बी.ई.पी.दराने विकला म्हणजे विक्री योग्य झाली असे म्हणणे चुकीचे होते.

क. वाटाघाटीद्वारे विक्री (निगोशिएशन सेल)

मालाची विक्री जाहीर लिलावे करण्याची पध्दत आहे. तथापि, काही वेळेस पार्टीशी वैयक्तिक वाटाघाटी करुन मालाची विक्री करण्यात येते. अशी विक्री प्रचलित पध्दतीत बसत नाही. व संशयास्पद वाटते. मात्र नियम डावलून अशा प्रकारची विक्री सन १९९०-९१ व सन १९८९-९० मध्ये मुख्यालयाकडून करण्यात आल्याचे दिसून येते.

१९ *विलंबाने उशिरा होणारी विक्री :-*

खरेदी केलेल्या मालाची विक्री ही ९० (नव्वद) दिवसांचे आत व्हावयास पाहिजे, ही नजरगहाण कर्जाची अट आहे. माल जादा दिवस पडून राहिल्यास त्या मालावरील खर्च (गोदाम भाडे, बँक व्याज, विमा, घट इ.) वाढत जातो व मालास विक्रीतून किंमत न मिळाल्यास तोटा होतो.

महामंडळाचा असा काही माल दोन वर्षापर्यंत गोदामत पडून राहतो. त्यामुळे मालाची प्रत खराब होते. व्यापारी खर्च वाढतो व त्याचे पर्यवसान महामंडळास तोटा वाढण्यात होते.

२०. *कार्यालयीन भाडे:-*

महामंडळाच्या वार्षिक अहवालांचे अवलोकन केलेअसता कार्यालयीन भाडे खर्चावर मागील सहा वर्षात खालीलप्रमाणे रक्कम खर्च झाल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | वर्ष | कार्यालयाचे भाडे लाखांत |
|---|---|---|
| १. | १९८४-८५ | रुपये ७.११ |
| २. | १९८५-८६ | रुपये ७.७६ |
| ३. | १९८६-८७ | रुपये ७.२९ |
| ४. | १९८७-८८ | रुपये ८.०८ |
| ५. | १९८८-८९ | रुपये ८.५० |
| ६. | १९८९-९० | रुपये ९.१२ |

महामंडळाची स्थापना होऊन २० वर्षे झालेली आहेत. महामंडळाची एकूण ४० कार्यालये आहेत. पैकी स्वतःच्या मालकीचे फक्त एकच कार्यालय आहे. कार्यालय बांधण्यासाठी शासनाकडून निधीचा पुरवठा केला जातो. तथापि, महामंडळाकडून तसा प्रयत्न केला गेलयाचे दिसून येत नाही.

महामंडळाने जर स्वतःच्या मालकीची कार्यालये बांधली तर भाड्यापोटी खर्च होणारे लाखो रुपये वाचतील व महामंडळाच्या मालमत्तेत वाढ होईल.

२१. *पर सेवेवर येणारे अधिकारी:-*

महामंडळ ही सहकारी तत्वावर चाललेली व्यापारी संस्था आहे. येथे काही वरिष्ठ पदावर पर सेवेवर सरकारी खात्याकडून अधिकारी नियुक्त केले जातात.

या अधिकाऱ्यांना महामंडळाच्या कामकाजाची माहिती नसते. महामंडळाचे कामकाज जाणून घेण्यास एक वर्षाचा कालावधी त्यांना लागतो. अशावेळी त्यांचे महामंडळाच्या कामाकडे मनापासून लक्ष नसते. अल्प काळासाठी आलेले असल्याने महामंडळाच्या भविष्याच्या दृष्टीने दीर्घ मुदतीचे नियोजन ते करीत नाहीत. परसेवेतील अधिकाऱ्यांच्या हाती महामंडळाचे पूर्ण नियोजन व व्यवस्थापन सोपविलेले असते. त्याचा काही वेळेस गैरवापरही होतो. गैरव्यवहार झाल्यास महामंडळ काही करु शकत नाही. फार तर त्यांच्या खात्यास परत पाठविले जाते.

# प्रकरण क्र.६

## सूचना तथा शिफारशी

आदिवासी बांधवांना आर्थिक विकास होण्यासाठी तसेच आदिवासींच्या मालाचे योग्य मोजमाप व्हावे, त्यांच्या उत्पादित मालाची योग्य व पुरेपुर किंमत त्यांना मिळावी, यासाठी त्यांच्या मालाची एकाधिकार पध्दतीने पध्दतीने खरेदी करण्यात येते. तसेच गौण वनौपजाचे खरेदी करण्याचे कामही महामंडळामार्फत करण्यात येते. एकाधिकार धान्य खरेदी सोबतच आदिवासी उपयोजना क्षेत्रात अन्न व नागरी पुरवठा खात्यासाठी राबविण्यात येणारी आधारभूत किंमत खरेदी योजना देखील महामंडळाने यशस्वीरित्या राबविलेली आहे. अडीअडचणींच्या काळात विशेषत: पावसाळ्यात आदिवासी शेतकऱ्यांना खाजगी व्यापारी, सावकारांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी खावटी कर्जाची योजना महामंडळ राबवित आहे. आदिवासी बांधवांच्या शेती उत्पादनात वाढ व्हावी, म्हणून १०० टक्के अनुदानावर बीजपंप/तेलपंप शासनाच्या वतीने खरेदी करुन शेतकऱ्यांच्या शेतीवर बसविण्याचे काम महामंडळ करीत आहे. तसेच स्वयंरोजगारासाठी कर्ज रक्कमेची गरज असलेले आदिवासी बांधवांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्याची 'ज्युबिलेअस बजेट कर्ज योजना' देखील महामंडळ १९८१-८२ पासून राबवित होते.

शासकीय आश्रमशाळांना पेयजल निर्मिती व्यवस्था योजना महामंडळाने राबविली आहे. आदिवासींना विविध प्रकारचे मोठे प्रकल्प उभारता यावे,यासाठी १९९२-९३ या वर्षापासून राष्ट्रीय अनुसूचित जाती/जमाती आर्थिक विकास निगम, नवी दिल्ली या संस्थेच्या आर्थिक सहकार्याने 'एकलव्य मिनी ट्रक योजना' सुरु करण्यात आलेली आहे..

शासनाच्या आदेशान्वये नव्यानेच 'द्वार वितरण योजना' महामंडळाकडून सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत सार्वजानिक वितरणासाठी अन्नधान्य स्वस्त धान्य दुकानादारापर्यंत वाहतूकीचे काम महामंडळ करीत आहे. या सर्व योजना महामंडळाकडून राबविल्या जात आहेत.

या सर्व योजना आदिवासी बांधवांना कितपत यशस्वी ठरल्या व या योजना राबविण्यामध्ये काय त्रुटी, मर्यादा जाणवल्या त्याचे विश्लेषण प्रकरण क्र.५ मध्ये आले आहे. आदिवासी विकास महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची कार्यक्षमता व लाभक्षमता वाढविण्याकरिता कोणती उपाययोजना आखता येईल या संदर्भातील सूचना पुढीलप्रमाणे-

१. मुख्याध्यापकांनी आदिवासी विकास महामंडळाकडून अन्नधान्याची व इतर वस्तुंची मागणी करतांना प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या किती आहे हे पाहून शासनाने ठरवून दिलेल्या विद्यार्थीनिहाय 'शिधा प्रमाणा' नुसार अन्नधान्य व इतर साहित्याची मागणीकरावी, प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून या नोंदविलेल्या मागणीची विद्यार्थी प्रमाणानुसार खात्री करुन मगच ही नोंदणी आदिवासी विकास महामंडळाकडे पाठवावी.

केवळ प्रत्येक वर्गात ४० विद्यार्थी हे मोघम प्रमाण ठरवून शिध्याची यादी पाठवून अतिरिक्त अन्नधान्याचा अपव्यय होणार नाही व योग्य प्रमाणात पुरेल एवढा शिधा आश्रमशाळेस उपलब्ध होईल.

याची काटेकोर अंमलबजावणी मुख्याध्यापक प्रकल्प स्तरावरील कार्यालयाकडून केली जावी.

२. आश्रमशाळांना पुरविण्यात येणाऱ्या मालाचे नमुने प्रकल्प अधिकारी व मुख्याध्यापकांना दाखवून निश्चित करण्यात यावेत व नंतरच महामंडळाकडून अन्नधान्याचा पुरवठा करण्यात यावा. तसेच जुना व कचरायुक्त अन्नधान्याचा पुरवठा महामंडळाकडून होऊ नये.

यामुळे निकृष्ट प्रतीचा व खराब माल बदलून देण्यामध्ये होणाऱ्या वेळेचा अपव्यय टाळणे शक्य होईल.

३. आश्रमशाळेकडून मालाची यादी प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत आदिवासी विकास महामंडळाकडे आल्यावर त्याची त्वरीत दखल घेण्यात येऊन अन्न धान्याचा पुरवठा करण्यात यावा.

तसेच किरकोळ वस्तु खरेदी करण्यासाठी रु.५००/- पर्यंतचे स्वातंत्र्य मुख्याध्यापकांना देण्यात यावे.

पर्यायाने आश्रमशाळेच्या व्यवस्थापनामध्ये अडचण निर्माण होणार नाही.

४. आश्रमशाळेस पुरविण्यात येणारा माल चांगल्या प्रतीचा असावा व तो चांगल्या प्रतीच्या बारदान पोत्यामधून पुरविण्यात यावा.

पर्यायाने अन्नधान्य वर्षभर चांगले टिकून बारदानाच्या पोत्याच्या छिद्रातून अन्नधान्याची गळती होणार नाही.

५. 'एकलव्य मिनीट्रक ' योजनेअंतर्गत पुरविण्यात येणारा ट्रक अशा कंपनीचा पुरविण्यात यावा की, जेणेकरुन त्याचे सुटे भाग जिल्हयाच्या ठिकाणी अथवा महाराष्ट्रातील मोठया शहरात उपलब्ध होतील.

सध्या पुरविण्यात येणाऱ्या ट्रकचे सुटे भाग बंगलोर शिवाय अन्यत्र उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे जामसर येथील लाभार्थीचा ट्रक गेली चार महिन्यापासून बंद अवस्थेत आहे.

६ योजना राबविण्याची संपूर्ण कार्यवाही एकाच यंत्रणेमार्फत एकाच विभागाकडून करण्यात यावी. पर्यायाने संयुक्तरित्या राबवावयाच्या योजनामध्ये जी अकार्यक्षमता निर्माण होते, ती कमी होण्यास मदत होईल. उदा.विद्युत पंप/तेलपंपाच्या बाबतीत सांगता येईल.

७. आदिवासी विकास महामंडळाकडून लाभार्थ्यांस देण्यात येणाऱ्या कर्जाच्या योजनांची वसूली करण्यासाठी प्रभावी व निश्चित अशी पध्दती ठरवून देण्यात यावी.

जेणेकरुन विहित मुदतीत लाभार्थीची कर्जफेड होऊन वसूलीचे प्रमाण वाढेल. पर्यायाने थकबाकीमुळे महामंडळास होणाऱ्या तोटयाचे प्रमाणही कमी होईल.

८. खावटी कर्ज वाटप विहित कालावधीसाठी असल्याने ते विशिष्ट मुदतीत लाभधारकाला मिळणे आवश्यक आहे. यासाठी ते पावसाळ्यापूर्वी वाटप करण्यात यावे.

जेणेकरुन दळणवळणाच्या व पाऊस पाण्याच्या अनेक समस्यांपासून त्यामुळे मार्ग निघेल.

९. प्रतवारीसाठी आवश्यक असणारी साधने आदिवासी विकास महामंडळाकडून प्रतवारीकारास त्वरीत पुरविण्यात यावीत. जेणेकरुन प्रतवारीकारास अन्नधान्य व इतर वस्तुंची प्रतवारी करण्यामध्ये अडचणी येणार नाहीत व प्रतवारी चांगल्या दर्जाची होईल.

तसेच प्रतवारीकारास प्रतवारी करण्याचे आधुनिक प्रशिक्षण देण्यात यावे.

१०. एकाधिकार खरेदीमध्ये आदिवासी शेतकऱ्यांकडून विक्रीस येणारा माल ओला तसेच स्वच्छ (जास्त कचरा नसलेला) आणण्याच्या सूचना व्यवस्थापकीय स्तरावरुन देण्यात याव्यात. (उदा.ओल्या शेंगा, कचरायुक्त धान्य)

जेणेकरुन अन्नधान्याबरोबर कचऱ्याची किंमत देण्याचा धोका महामंडळाकडून टाळणे शक्य होईल.

११. गवत एकाधिकार खरेदी योजना ही आदिवासींना लाभदायक व उत्पन्न मिळवून देणारी होती. तथापि, उणिवांकडे लक्ष देऊन त्या उणिवा दूर करुन ही योजना पुनश्च सुरु करण्यात यावी. उदा. विक्रीचे नियोजन पावसाळ्यापूर्वी करण्यात यावे.

१२. गौण वनोत्पादन खरेदीच्या मोबदल्यात वन खात्यास रॉयल्टीची किंमत देऊन महामंडळास नफा होईल इतपत गौण वनोत्पादनाची खरेदी होणे महामंडळाकडून अपेक्षित आहे. यासाठी व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या गौण वनोत्पादनाच्या खरेदीवर निर्बंध घालण्यात यावेत. आदिवासी लाभधारकांना गौण वनोत्पादन आदिवासी विकास महामंडळाकडे विकण्याविषयी सूचना देण्यात याव्यात. अन्यथा वन खात्यास द्याव्या लागणाऱ्या रॉयल्टीच्या किंमतीत कपात करण्यात यावी. जेणेकरुन महामंडळास तोटा होणार नाही.

१३. आदिवासी विकास महामंडळाकडून खरेदी केलेल्या अन्नधान्य व गौण वनोत्पादनाची विक्री त्वरीत केली जावी. (९० दिवसांचेआत)

पर्यायाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून घेतलेल्या नजरगहाण कर्जावर भरमसाठ व्याज द्यावे लागण्याचा भुर्दंड आदिवासी विकास महामंडळास द्यावा लागणार नाही व महामंडळाच्या खर्चात कपात होईल.

१४. कृषी उत्पन्न बाजार समितीकडून सेसपोटी देण्यात येणाऱ्या रक्कमेच्या बदल्यात ज्या आवश्यक सुविधा पुरविण्याची जबाबदारी आहे., त्या सुविधा जर कृषी उत्पन्न बाजार समितीकडून पुरविल्या जात नसतील तर सेसपोटी देण्यात येणारी रक्कम कायद्यातील तरतूदीत बदल करुन त्वरीत बंद करण्यात यावी. अन्यथा कृषी उत्पन्न बाजार समितीस या सुविधा पुरविण्याचे निर्बंध आदिवासी विकास महामंडळाकडून घालण्यात यावेत.

१५. आदिवासी विकास महामंडळाच्या अत्यंत जुन्या. दुरावस्था झालेल्या गोदामांची त्वरीत दुरुस्ती करण्यात यावी व उघड्यावर ठेवण्यात येणाऱ्या मालाचा विमा उतरविण्यात यावा. गोदामाची दुरुस्ती केल्याने अन्नधान्य व इतर मालाचे पाऊस, उंदीर, घुशी यापासून संरक्षण होऊन नासाडी होणार नाही.

१६. वाहतूकीच्या दृष्टीने सोयीस्कर व आदिवासी लाभार्थ्यांना माल घेऊन येणे सोयीस्कर होईल, असे ठिकाण निवडण्यात येऊन तेथे शासनाच्या मंजूर प्रस्तावानुसार नवीन गोदामांचे बांधकाम सुरु करण्याचा प्रयत्न करणे.

जेणेकरुन गोदामांच्या भाडे खर्चापोटी होणाऱ्या खर्चाचे प्रमाण कमी होईल.

१७. महामंडळास भरडाई खर्चापोटी खूप मोठी रक्कम मोजावी लागते व ही रक्कम खाजगी मिल मालकास द्यावी लागते. तेवढ्याच खर्चात महामंडळास स्वतःची भरडाई मिल उभी करता येणे शक्य असल्याने हळू हळू

एक-एका प्रादेशिक कार्यालयांतर्गत एक भरडाई मिल उभी करण्याचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर करुन मिल उभारण्याचा प्रयत्न महामंडळाकडून करण्यात यावा.

जेणेकरुन भरडाई खर्चावर होणारा भरमसाठी खर्चाचा अपव्यय टाळता येईल.

१८. आदिवासी विकास महामंडळाकडील ट्रक व ट्रॅक्टर तांत्रिक बिघाडाने बंद पडल्याने जागेवर उभे असतात. अशा ट्रक व ट्रॅक्टरची दुरुस्ती त्वरीत करुन घेण्यात यावी.

मुख्यालयाकडे पाठविण्यात येणाऱ्या गाड्या दुरुस्तीच्या प्रस्तावाच्या मंजूरीच्या प्रतिक्षेत तीन ते चार महिने कामाविना पडून राहतात. पर्यायाने वेळेचा अपव्यय होतो व दुरुस्तीवर होणारा खर्च हा होतोच. यासाठी ट्रॅक्टरची, ट्रकची त्वरीत दुरुस्ती करुन घेण्यात यावी. जेणेकरुन वेळेचा व खर्चाचा अपव्यय होणार नाही.

१९. महामंडळास अधिक फायदा होण्याच्या दृष्टीने खरेदी केलेल्या मालाची लिलाव पध्दतीने विक्री करण्यात यावी. या पध्दतीने विक्री केल्याने महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होईल.

तसेच मालाची विक्री अधिक फायदेशीर होण्यासाठी महामंडळाकडून पुढील बाबींचे नियोजन आखण्यात यावे.

अ. मार्केट संशोधन- मालाच्या विक्रीपूर्वी महामंडळाकडून निश्चित करण्यात आलेले संभाव्य भाव व त्या मालास प्रत्यक्ष मिळालेले प्रति क्विंटल भाव यांची पडताळणी करण्यासाठी व बाजारभावाची माहिती संकलित करणारी यंत्रणा महामंडळाकडून उभारली जावी. तसेच या यंत्रणेकडून बाजारातील दररोजचे खरेदी विक्रीचे दर यांचीही माहिती संकलित केली जावी व त्याचा उपयोग महामंडळाच्या एकाधिकार खरेदी योजनेतील धान्य खरेदी विक्रीस उपयोगात आणावी.

ब. बी.ई.पी.दराने विक्री करण्यापेक्षा संबंधित दिवशीच्या बाजारभावानुसार विक्रीची किंमत पाहून व लिलावाद्वारे येणारे विक्रीच्या किंमतीतील समतोल साधून जी जास्त किंमत असेल त्यानुसार योग्य निर्णय घेऊन महामंडळाकडून मालाची विक्री करण्यात यावी.

क. महामंडळाकडून १९८९-९० व १९९०-९१ मध्ये वाटाघाटीद्वारे विक्री केली गेली. तथापि, अशाप्रकारे होणारी विक्रीची पध्दती (निगोशियबल विक्री) बंद करण्यात येऊन कायदेशीर पध्दतीने म्हणजे लिलाव पध्दतीने विक्री करण्यात यावी.

वरील पध्दतीने विक्री केल्यास संशयास्पदरित्या होणाऱ्या विक्रीचा आक्षेप टाळणे शक्य होईल.

२०. खरेदी केलेला माल हा बँकेच्या 'नजर गहाण' कर्जाच्या अटीप्रमाणे ९० दिवसांचे आत विकला जावा.

वरीलप्रमाणे निर्णय घेतल्यास ९० दिवसांचे पुढे माल पडून राहिल्याने मालावर होणारा गोदामभाडे खर्च, बँक व्याज, विमा,घट इ. खर्चावर होणारा आर्थिक अपव्यय टाळणे शक्य होईल व मालास योग्यवेळी योग्य किंमत मिळाल्याने किंमतीचे अवमूल्यनही टाळणे शक्य होईल.

तसेच त्वरीत (गोदामात पडून न राहण्याच्या पध्दतीने) मालास उठाव मिळाल्याने मालाची प्रतही चांगली राहील व त्याचे पर्यावसान महामंडळास फायदा होण्यामध्ये होईल.

२१. महामंडळातील वरिष्ठ पदावर परसेवेवर घेण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रमाण कमी करण्यात येऊन महामंडळातीलच अधिकाऱ्यांना वरील पदावर पदोन्नती देण्यात यावी. अथवा त्या पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक, अनुभव व वयाची अट निश्चित करण्यात येऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पदे भरण्यात यावीत.

जेणेकरून अशापध्दतीने येणारे अधिकारी हे महामंडळाचे स्वतःचेच असल्याने महामंडळाचे कामकाज मनापासून जाणून घेऊन लक्षपूर्वक काम करतील. तसेच त्यांच्याकडून दीर्घमुदतीचे नियोजन करणेही शक्य होईल. अशा पध्दतीने निवडण्यात आलेल्या अधिकाऱ्यांवर महामंडळाचे नियोजन व व्यवस्थापन सोपविलेले असल्याने त्याचा गैरवापर होण्याची शक्यताही कमी प्रमाणात होईल.

***

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या संस्थेच्या कार्यपध्दतीचा सखोल अभ्यास १९९३.

### प्रपत्र क्र. १

### चौक क्र. १ : प्रस्ताविक

१. अधिकाऱ्याचे नांव :

२. हुद्दा/पद :

३. कार्यालयाचे नांव व पत्ता :

४. कामाच्या अनुभवाचा तपशील :
[कोठे कोठे काम केले आहे]

### चौक क्र. ३ : एकाधिकार खरेदी योजना

१. महामंडळ आदिवासी शेतकऱ्यांकडून कोणकोणती कृषी उत्पादने खरेदी करते ? :

| अ.क्र. | वर्ष | कृषी उत्पादनाचे नांव | उत्पादन [क्वींटलमध्ये] | उत्पादनाची विक्री | नफा | तोटा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९८५ | | | | | |
| २. | १९८६ | | | | | |
| ३. | १९८७ | | | | | |
| ४. | १९८८ | | | | | |
| ५. | १९८९ | | | | | |
| ६. | १९९० | | | | | |
| ७. | १९९१ | | | | | |
| ८. | १९९२ | | | | | |

*[कृपया विस्तृत तक्ता जोडावा]

२. महामंडळ आदिवासींकडून कोण- :
कोणती वनोत्पादने खरेदी करते ?

| अ.क्र. | वर्ष | वनोत्पादनाचे नांव | वनोत्पादन [क्वींटलमध्ये] | वनोत्पादन [खरेदी किंमत] | विक्री | नफा | तोटा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९८५ | | | | | | |
| २. | १९८६ | | | | | | |
| ३. | १९८७ | | | | | | |
| ४. | १९८८ | | | | | | |
| ५. | १९८९ | | | | | | |
| ६. | १९९० | | | | | | |
| ७. | १९९१ | | | | | | |
| ८. | १९९२ | | | | | | |

[कृपया विस्तृत तक्ता जोडावा

३. हा माल फक्त आदिवासींकडून/ :
आदिवासी विभागातील बिगर
आदिवासींकडून/कोणत्याही
उत्पादकाकडून खरेदी केला जातो.

४. वनोत्पादने/कृषी उत्पादने :
कोणत्या पध्दतीने खरेदी केली
जातात.

५. खरेदी केलेल्या मालाची :
साठवण करण्यासाठी महा-
मंडळाने पक्क्या गोदामांची
व्यवस्था केली आहे का ?

६. ही व्यवस्था मालाचे संरक्षण :
करण्यासाठी पुरेशी आहे का ?

७. ही व्यवस्था अपुरी असेल किंवा त्यात काही त्रुटी असतील तर त्यामुळे मालाचे नुकसान होते काय ? कशाप्रकारे. :

८. खरेदी केंद्रापासून गोदामा पर्यंतचे साधारण अंतर काय असते? :

९. खरेदी केलेल्या मालाचे वर्गीकरण कोण करते ? कशाप्रकारे ? :

१०. खरेदी केलेल्या मालाची लगेच पुनर्विक्री होते कां ? :

११. होत असल्यास हा माल कशाप्रकारे विकला जातो ? :

१२. एकाधिकार खरेदी केंद्रामधून आदिवासींना लगेच मालाचे पैसे दिले जातात कां ? : होय / नाही

१३. एकाधिकार खरेदी केंद्रावर आदिवासी आपला सर्व माल विक्रीसाठी आणतात कां ? : होय / नाही

१४. एकाधिकार खरेदी केंद्रा व्यतिरिक्त आदिवासी खाजगी व्यापाऱ्यांना आपला माल विकतात कां ? : होय / नाही

१५. विकत असल्यास त्यांना ही गरज का भासत असावी ? :

१६. या योजनेमुळे आदिवासींचे शोषण थांबले आहे असे आपल्याला वाटते कां ? :

१७. या योजनेला आदिवासींचा मिळणारा प्रतिसाद कसा आहे ? :

## चौक क्र. ३ : आश्रमशाळा

१. महामंडळाकडून आश्रमशाळांना कोणत्या वस्तूंचा पुरवठा होतो :

| | |
|---|---|
| १] | ६] |
| २] | ७] |
| ३] | ८] |
| ४] | ९] |
| ५] | १०] |

२. आश्रमशाळांना वस्तूंचा पुरवठा करण्यासंबंधीची मागणी मुख्याध्यापकाकडून आपणाकडे कशी येते ? :

३. मुख्याध्यापकांची मागणी प्राप्त झाल्यानंतर महामंडळाकडून सदरचा वस्तूंचा पुरवठा त्वरीत आश्रमशाळेस करण्यात येतो कां ? :

४. नसल्यास किती अवधी लागतो? :

५. मुख्याध्यापकांनी मागणी केलेला माल महामंडळाकडे नसेल तर त्यावर महामंडळ काय कार्यवाही करते ? :

६. त्याचे वार्षिक वेळापत्रक कोणते आहे ? :

७. शासकीय आश्रमशाळांना आदिवासी विकास महामंडळानेच अन्नधान्य व किराणा माल पुरविण्याबाबतचे शासनाचे आदेश. :

८. महामंडळाकडील अधिसूचित वस्तूंव्यतिरिक्त लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा महामंडळ कशाप्रकारे करते ? :

९. महामंडळाची "खरेदी" याबाबत :
कायम स्वरूपाचे काही धोरण
आहे का ?

१०. महामंडळाच्या खरेदी धोरणा- :
संबंधी आपल्या काय सूचना
आहेत ?

११. मुख्याध्यापक, अधीक्षक, प्रकल्प :
अधिकारी, अपर आयुक्त, महा
व्यवस्थापक व मुख्य कार्यालय
यांनी यासंबंधी कायमचे धोरण
म्हणून कोणत्या सूचना निर्गमित
करावयात असे आपणांस वाटते ?

१२. शासकीय आश्रमशाळेला पिण्या- :
च्या पाण्याची व्यवस्था महा-
मंडळाकडून कोणत्या प्रकारे
करण्यात येते ?

१३. त्यासाठी कोणत्या स्तरावरून :
निधी उपलब्ध करून दिला
जातो.

१४. पाणी पुरवठयाची योजना :
राबविण्यासाठी महामंडळाने
कोणकोणत्या संस्थांची
मदत घेतली ?

१५. आतापर्यंत कोणकोणत्या :
आश्रमशाळांना महामंडाळाकडून
पाणी पुरवठयाची योजना
कार्यान्वित करण्यात आली ?

१६. सदरची योजना राबविण्या- :
बाबतचे आपले अभिप्राय
व सूचना.

## चौक क्र. ४ : विद्युतपंप/तेलपंप पुरवठा

१. या योजनेची कार्यवाही कशाप्रकारे होते ? :

२. विद्युतपंप/तेलपंपाची खरेदी पध्दत काय आहे ? :

३. या योजनेमध्ये महामंडळा-व्यतिरिक्त अन्य सहभागी शासकीय संस्था कोणत्या ? :

४. मंजूर विद्युतपंप/तेलपंप बसविण्या-बाबत वार्षिक वेळापत्रक ठरविण्यात आले आहे काय ? [मंजुरी मिळाल्यापासून ते पंप बसविण्यापर्यंत] :

५. या योजनेला आदिवासींकडून मिळणारा प्रतिसाद कसा आहे ? :

६. गेल्या पाच वर्षात विद्युतपंप/तेलपंप मागणाऱ्या आदिवासींच्या संख्येत वाढ झाली आहे असे तुम्हाला वाटते का ? :

| अ.क्र. | वर्ष | मंजूर पंप | बसविले गेलेले पंप | प्रत्यक्षात कार्यान्वित | अकार्यान्वित | अकार्यान्वित असण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९८५-८६ | | | | | |
| २. | १९८६-८७ | | | | | |
| ३. | १९८७-८८ | | | | | |
| ४. | १९८८-८९ | | | | | |
| ५. | १९८९-९० | | | | | |
| ६. | १९९०-९१ | | | | | |
| ७. | १९९१-९२ | | | | | |
| ८. | १९९२-९३ | | | | | |

७. बीजपंप/तेलपंपाच्या मागणी बाबत आदिवासींकडून आपणास विचारणा होते काय ? होत असल्यास कुठल्या प्रकारची विचारणा होते ? :

८. त्यावर आपल्याकडून कोणती कार्यवाही होते ? :

९. मार्गदर्शक समितीने मंजूर केलेल्या पंपाची खरेदी करण्यास किती अवधी जातो ? :

१०. मार्गदर्शक समितीने मंजूर केलेल्या बीजपंप/तेलपंपाची लाभार्थींची यादी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडून आपणास कधी मिळते ? :

११. दिलेले बीजपंप / तेलपंप बंद आहेत असे आढळून आल्यास महामंडळ काय कार्यवाही करते ? :

१२. ही योजना अजून चांगल्याप्रकारे कार्यान्वित होण्यासाठी आपले अभिप्राय, सूचना काय आहेत ? :

## चौक क्र. ५ : खावटी कर्ज

१. खावटी कर्ज योजनेचे स्वरूप नेमके काय आहे ? :

२. खावटी कर्ज वाटपासाठी आदिवासींची निवड कशी करण्यात येते ? :

३. खावटी कर्ज योजने अंतर्गत आदिवासींना कोणत्या वस्तू पुरविल्या जातात. :

४. या योजने अंतर्गत आदिवासींना : किती रकमेचे कर्ज दिले जाते ?

५. खावटी कर्ज वाटप विहित : १]
कालावधीमध्ये कां होत नाही? २]
३]
४]
५]

या संदर्भात कोणत्या स्तरा- : १] प्रादेशिक कार्यालय
वर अडचणी येतात ? २] उपप्रादेशिक कार्यालय
३] सहकारी संस्था
४] बँक

६. अन्नधान्यस्वरूपाने देण्यात आलेल्या खावटीबद्दल आदिवासींची तक्रार असते कां ? : होय / नाही

७. असल्यास कोणती ? : १]
२]
३]
४]
५]

८. रोखीने देण्यात येणारी रक्कम लाभार्थीस पूर्ण स्वरूपात दिली जाते की त्यातून काही वजाती केल्या जातात ? :

९. या कर्जाची परतफेड करण्या-बाबतचे नियम : :

१०. कर्जफेडीचा कालावधी किती असतो ? :

११. नियमाप्रमाणे कर्जाची परतफेड होते कां ? : होय / नाही

१२. नियमाप्रमाणे कर्जाची परतफेड न झाल्यास महामंडळ कोणत्या पध्दतीने वसुली करते ? :

१३. खावटी कर्ज योजनेमुळे आदिवासींचे सावकारांपासून होणारे आर्थिक शोषण कमी झाले आहे असे तुम्हाला वाटते कां ? : होय / नाही

१४. झाले नसल्यास त्यामागची कारणे काय असावीत असे आपल्याला वाटते ? :

## चौक क्र. ६ : न्युक्लिअस बजेट

१. न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत आदिवासींना दिल्या जाणाऱ्या कर्जाचे निकष काय आहेत ? :

२. या योजनेसाठी लाभार्थींची निवड कशी केली जाते ? :

३. या योजनेअंतर्गत कर्जवाटप करण्यामागे महामंडळांचा उद्देश काय आहे ? :

४. या कर्जाचा वापर लाभार्थी उद्योग व्यवसायासाठीच करतात याची पहाणी केली जाते कां ? :

५. या कर्जाची परतफेड करण्याबाबत नियम काय आहेत ? :

६. नियमाप्रमाणे परतफेड न झाल्यास कर्जाची वसुली कशी केली जाते ? :

## चौक क्र. ७ : प्राथमिक केंद्र

१. महामंडळाने सुरु केलेली प्राथमिक केंद्र/स्वस्त धान्य विक्री दुकान ही योजना आपल्या प्रादेशिक विभागांतर्गत चालू आहे कां ? : होय / नाही

अ] नसल्यास त्यामागील अडचणी : १]
२]
३]

ब] ही योजना चालू असल्यास :
या केंद्रात कोणत्या वस्तू
विक्रीस ठेवण्यात येतात ?

क] या वस्तूंची किंमत बाजार- :
भावापेक्षाही कमी असते का ?

ड] या वस्तू खरेदी करण्या- :
साठी आदिवासींना रोख
पैसे दिले जातात का ?

इ] आदिवासींचा या योजनेला :
मिळणारा प्रतिसाद कसा
आहे ?

## चौक.क्र. ८ : सेवा योजना

१. सेवायोजना [नांव नोंदणी व : होय / नाही
नावे शिफारस करणे] ही
योजना आजही चालू आहे का ?

२. या योजनेची माहिती दुर्गम :
भागातील आदिवासी युवकांना
आहे का ?

३. १९८५-८६ ते १९९१-९२ या :
कालावधीत किती युवकांनी
या योजनेअंतर्गत नांवनोंदणी
केली ?

४. आपल्या कार्यालयाकडे हे काम :
चालू ठेवावे की नाही याबाबत
आपले काय मत आहे ?

## चौक क्र. ९ : सहकार विभाग/पुरवठा विभाग/ आदिवासी विकास यांचेशी समन्वय साधणे

१.] सहकार विभाग

१. एकाधिकार खरेदी केंद्रे :
चालविताना सहकार विभागांतील
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
यांचे नियंत्रणाखालील कर्म-
चाऱ्यांकडून आपणांस पूर्ण
सहकार्य मिळते का ?

२. या संदर्भात महामंडळाची :
नेमकी अपेक्षा काय आहे ?

२] पुरवठा विभाग,

१. पुरवठा विभागाकडून वेळोवेळी :
दर निश्चित करून दिले जातात
काय ?

२. निश्चित करून दिलेल्या दराबाबत:
आदिवासी समाधानी असतात
का ?

३. समाधानी नसल्यास महामंडळ :
याबाबत कोणता निर्णय घेते?

१. प्रकल्प पातळीवर समन्वयासंबंधी :
आपल्याला कोणत्या अडचणी
येतात ?

चौक क्र. १० : प्रशासकीय समस्या

१. उपरोक्त विविध योजनांची :
कार्यवाही करीत असतांना
कोणत्या प्रशासकीय समस्या
जाणवतात ?

२. आदिवासी विकास महामंडळाच्या:
योजना कार्यान्वित करताना
उपलब्ध सर्व यंत्रणा पुरेशी
वाटते का ?

३. यंत्रणेद्वारे विहित केलेले :
कामकाज वेळोवेळी केले जाते काय?

४. योजना राबविणे अथवा योजनेची:
व्याप्ती वाढविणे याबाबत आपले
काही प्रशासकीय प्रस्ताव शासना-
कडे/वरीष्ठ कार्यालयाकडे प्रलंबित
आहेत काय ?

---

ठिकाण :
दिनांक :

अधिका-याची स्वाक्षरी

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या संस्थेच्या कार्यपध्दतीचा सखोल अभ्यास - १९९३.

### लाभार्थीसाठी प्रश्नावली

### प्रपत्र क्र. २

#### चौक क्र. १ : प्रास्ताविक

१] लाभार्थ्याचे संपूर्ण नांव :

गांव : तालुका :

२] आदिवासी जमातीचे नांव :

३] लाभार्थ्याचे वार्षिक उत्पन्न :

#### चौक क्र. २ : महामंडळाकडून मिळालेली मदत

१] आजपर्यंत महामंडळाच्या कोणकोणत्या योजनांचा लाभ घेतला ? : १]
२]
३]
४]

२] महामंडळाला वन व कृषिउत्पादने विकता का ? : होय / नाही

अ] विकत असल्यास कोणती : १]
२]
३]
४]
५]

३] एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत माल खरेदीची किंमत कशा प्रकारे मिळते. : १] खरेदी केली त्यावेळी :
२] खरेदी केल्यानंतर काही कालाने [काळ नमूद करावा]

४] महामंडळाकडून/खरेदी केंद्राकडून : होय / नाही
पैसे मिळण्यास उशिर झाल्या-
मुळे आपले नुकसान होते कां ?

अ] अशाप्रकारे होणाऱ्या :
नुकसानीची माहिती द्यावी.

५] महामंडळाला माल विकणे :
परवडते की खाजी व्यापाऱ्यांना

अ] का ?

६] आपल्या परिसरात महामंडळाची :
खरेदी केंद्रे कोठे कोठे आहेत ?

७] आपल्या गावांपासून/पाड्या :
पासून खरेदी केंद्राचे साधारण
अंतर.

८] आपल्या गावांपासून केंद्र जास्त :
अंतरावर आहे असे आपणास
वाटते का ?

९] केंद्र दूर असल्यास माल नेण्या- :
मध्ये काय अडचणी येतात ?

१०] तुम्हाला विद्युतपंप/तेलपंप मिळाला : होय / नाही
आहे काय ?

११] पंप सध्या चालू स्थितीत, : होय / नाही
वापरात आहे कां ?

१२] या योजनेमुळे तुम्हाला आर्थिक : होय / नाही
फायदा झाला कां ?

अ] कशाप्रकारे

१३] खावटी कर्ज योजनेचा लाभ : होय / नाही
घेता कां ?

१४] या योजनेसंबंधी आपणास :
काय माहिती आहे ?

अ] या योजनेतून मिळणारे कर्ज : वस्तूस्पात/रोख पैशांच्या स्पात, यापैकी कसे असते ?

ब] या योजनेत कर्ज स्वस्पात : १]
कोणत्या वस्तू मिळाल्या ? २]
३]

१५] तुम्ही या कर्जाची परतफेड केली : का ?

१६] हे कर्ज किती काळात परत फेडणे : ........महिने...... वर्षे
आवश्यक आहे ?

१७] ही परतफेड न केल्यास त्यावर : १]
महामंडळ काय उपाययोजना करते? २]
३]

१८] या योजनेमुळे सावकारी आर्थिक : होय / नाही
शोषणापासून सुटका झाली असे वाटते का ?

अ] नसल्यास का नाही याची : १]
कारणे नमूद करा. २]
३]

१९] न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत : होय / नाही
तुम्हाला सहाय्य मिळाले आहे का?

२०] महामंडळाने सुरु केलेल्या प्राथमिक : होय / नाही
केंद्राचा [स्वस्त धान्य विक्री दुकाने] लाभ तुम्ही घेता का ?

२१] या दुकानात कोणकोणत्या : १] ६]
वस्तू खरेदीस उपलब्ध होतात ? २] ७]
३] ८]
४] ९]
५] १०]

२२] तुम्ही सर्व किराणामाल या : होय / नाही
प्राथमिक केंद्रातूनच खरेदी करता का ?

२३] महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ तुम्ही घेता कां ? : होय / नाही

अ] घेत नसल्यास त्याची कारणे : १]
२]
३]

२४] लाभ घेत असलेल्या योजनांमुळे तुमच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली असे तुम्हाला वाटते कां ? : होय / नाही

२५] आदिवासी विकास महामंडळाच्या खरेदी केंद्राच्या कार्यपध्दतीबाबत आपल्या काही सूचना आहेत कां ? : होय / नाही
१]
२]
३]

२६] आपण केलेल्या सूचनांचा विचार केल्यावर आदिवासींचा कशाप्रकारे फायदा होईल असे आपणास वाटते. : १]
२]
३]
४]

२७] वीजपंप व तेलपंप या योजनेच्या अंमलबजावणीच्या संदर्भात आपल्या काही सूचना आहेत काय ? :

२८] आपल्या सूचनेमुळे आदिवासींचा काय फायदा होईल ? :

२९] खावटी कर्ज योजनेचा लाभ आदिवासींना कोणत्या महिन्यात मिळावा असे आपणास वाटते ? :

३०] शासकीय आश्रमशाळांना महामंडळाकडून होणारा अन्नधान्य पुरवठा, त्याचा दर्जा याबाबत आपले काय मत आहे? त्यामध्ये काही बदल व्हावा असे आपणास वाटते काय ? :

अ] कोणता बदल ?

३१] या योजनांव्यतिरिक्त आदिवासी :
विकास महामंडळाकडून कोणती
मदत तुम्हाला योजना स्मात
मिळावी असे वाटते ?

ठिकाण :

दिनांक :

लाभार्थीची स्वाक्षरी

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या संस्थेच्या कार्यपध्दतीचा सखोल : १९९१-९२

### प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली

प्रपत्र क्र. ३

चौक क्र. १

१] प्रकल्प अधिकाऱ्याचे नांव :

२] विभागीय कार्यालयाचा पत्ता :

३] या पदावर काम करण्याचा अनुभव :

### चौक क्र. २ : आदिवासी विकास महामंडळ व संबंधित योजना

१] आदिवासी विकासासाठी महामंडळाच्या सहकार्याने आपण कोणकोणत्या योजना कार्यान्वित करता. : १]
२]
३]
४]
५]

२] आश्रमशाळेला अन्नधान्य व किराणा साहित्य पुरवठा ही योजना महामंडळाच्या सहाय्याने कशी कार्यान्वित होते ? :

३] आपण मागणी कळविल्यानंतर महामंडळ त्वरीत वस्तू पुरवठा करते कां ? :

४] नसल्यास साधारणत: किती विलंब होतो ? :

५] आपल्या विभागातील आश्रम शाळांकडून महामंडळाच्या वस्तू पुरविण्याबाबत वस्तूंच्या दर्जाबाबत, वस्तू पुरविण्यात होणाऱ्या दिरंगाईबाबत प्रतिक्रिया नोंदविल्या जातात कां ? :

६] या प्रतिक्रियांचा रोखा कसा :
असतो.

७] आश्रमशाळांनी वस्तू पुरवठया- :
बाबत नाराजी व्यक्त केल्यास,
आपण त्यावर काय कार्यवाही
करता ?

८] आपण त्या संदर्भात महा- :
मंडळाला सूचना देता कां ?

९] आपल्या सूचनांनुसार महा- :
मंडळाने कार्यप्रणालीत सुधारणा
केल्याचे निदर्शनास आले कां ?

१०] महामंडळाकडून होत असलेल्या :
वस्तू पुरवठयाबाबत आपण
समाधानी आहात कां ?

११] हे काम अधिक कार्यक्षमतेने : १]
पार पडावे यासाठी आपल्या २]
सूचना. ३]

१२] आदिवासी विकास महामंडळा- :
मार्फत पाणीपुरवठा योजना
कार्यान्वित झाली आहे काय?
अथवा महामंडळामार्फत तसा
प्रस्ताव आहे काय ? :

१३] असल्यास तपशील द्यावा. :

१४] विद्युत पंप/तेलपंप ही योजना :
आपण व महामंडळ संयुक्तिक-
रित्या कशी कार्यान्वित
करता ?

१५] या योजनेबाबत व महामंडळा- :
च्या सहभागाबद्दल आपले
अभिप्राय व सूचना.

१६] आपण महामंडळाबरोबर विविध : होय / नाही
योजना संयुक्तकरित्या राबवित
असताना आपल्याला प्रशासकीय/
व्यवस्थापकीय समस्या जाणवतात
का ?

१७] कोणत्या ? : १]
२]
३]

१८] संयुक्तरित्या राबविल्या जाणाऱ्या
योजना अधिक कार्यक्षमतेने :
राबविल्या जाव्या याबाबत
आपण काही सूचना देऊ इच्छिता
का ?

ठिकाण :

प्रकल्प अधिकाऱ्याची स्वाक्षरी

दिनांक :

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

आदिवासी विकास महामंडळ, नाशिक या संस्थेच्या कार्यपध्दतीचा सखोल अभ्यास - १९९३

शासकीय आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली

प्रपत्र क्र. ४

चौक क्र. १ - प्रास्ताविक

१] आश्रमशाळेचे नांव :
गांव : तालुका:
जिल्हा:

२] मुख्याध्यापकांचे नांव :

३] शिक्षण :

४] या पदावर काम करण्याचा अनुभव :

५] आश्रमशाळा बेसिक/पोस्ट बेसिक आहे. :

६] आश्रमशाळेतील एकूण विद्यार्थी संख्या. :
एकूण मुले : एकूण मुली:

७] आश्रमशाळेतील एकूण शिक्षक संख्या :

८] त्यापैकी प्रशिक्षित शिक्षक संख्या :

९] आश्रमशाळेतील इतर कर्मचारी संख्या :

चौक क्र. २ - महामंडळाकडून होणारा वस्तूपुरवठा

१] आपल्याला महामंडळाकडून कोणकोणत्या वस्तूंचा पुरवठा होतो ? :
१] ६]
२] ७]
३] ८]
४] ९]
५] १०]

| | | |
|---|---|---|
| २] आपण या वस्तूंची मागणी कशी नोंदविता ? | : | |
| ३] मागणी नोंदविण्याचा वार्षिक कालावधी कोणता असतो ? | : | |
| ४] मागणी नोंदविल्यानंतर लगेच माल पुरविला जातो का ? | : | होय / नाही |
| ५] नसल्यास किती कालावधी आपल्याला वाट बघावी लागते ? | : | |
| ६] माल मिळण्यास फारच उशिर झाला तर आपण कोणती पर्यायी व्यवस्था करता ? | : | |
| ७] आश्रमशाळेला महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंचा दर्जा कसा असतो ? [यादीसह नमूद करा] | : | उत्तम / सर्वसाधारण / निकृष्ट |
| ८] महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंचा दर्जा निकृष्ट असेल अथवा त्या मागणीपेक्षा अपुऱ्या असल्या तर आपण त्याबाबत तक्रार करता का ? | : | |
| ९] करत असल्यास कोणाकडे ? | : | |
| १०] आपल्या तक्रारीवर त्वरीत कार्यवाही होते का ? तसेच ही कार्यवाही कशाप्रकारे होते. | : | |
| ११] तक्रार करीत नसल्यास न करण्याचे कारण नमूद करा. | : | |
| १२] अधिसूचित वस्तू व्यतिरिक्त अन्य वस्तूंचा पुरवठाही महामंडळ करते यावर आपला अभिप्राय व सूचना. | : | |

१३] महामंडळ आश्रमशाळांना :
वस्तूपुरवठा करते याबाबत
आपले अभिप्राय व सूचना.

१४] या पध्दतीत काही बदल व्हावा :
असे आपल्याला वाटते का ?

१५] कोणता बदल आपण सुचवू :
इच्छिता ?

१६] आपण सुचविलेल्या बदलामुळे :
आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांचा
कशाप्रकारे फायदा होईल
असे आपणांस वाटते ?

ठिकाण : मुख्याध्यापकाची स्वाक्षरी

दिनांक :